CMYK

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५ | वर्ष - ३ रे | अंक २५० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### नाशिकमध्ये आजपासून १५ हजार झाडांच्या महा-वृक्षारोपणाचा शुभारंभ

नाशिकमध्ये १५,००० झाडे लावण्याच्या महा-वृक्षारोपण अभियानाला आजपासून सुरुवात होत आहे. या कार्यक्रमात गिरीश महाजन, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे प्रमुख साधू-महंत तसेच त्र्यंबकेश्र्वर आणि नाशिकमधील १३ आखाड्यांचे प्रमुख सहभागी होणार आहेत. पहिल्या टप्प्यात ४ वेगवेगळ्या ठिकाणी १,००० झाडांचे रोपण होणार आहे, ज्यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील महामंडले'यवर देखील उपस्थित राहतील.

### तुळजापूर ड्रग्ज प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत

**तुळजापूर :** तुळजापूर ड्रग्ज प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी मांडली. तर दुसरीकडे ड्रग्ज प्रकरणातील जामीनवर सुटलेल्या विनोद गंगणे यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांना अब्रू नुकसानीची नोटीस बजावली आहे. विनोद गंगणे हे तुळजापूर मध्ये भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आहेत. बदनामी केल्याप्रकरणी खासदार ओमराजे निंबाळकरांवर गंगणे यांचा अब्रू नुकसानीचा दहा कोटी रुपयांचा दावा ठोकण्यात आला आहे.

### सोलापुरात ऊस दर जाहीर करण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक

सोलापुरात ऊस दर जाहीर करण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यातील लोकमंगल साखर कारखाना स्वाभिमानीच्या पदाधिकाऱ्यांनी बंद पाडला आहे. लोकमंगल साखर कारखान्याच्या गव्हाणीत उड्या मारून चालू कारखान्याचे गाळप बंद पाडले. जोपर्यंत साखर कारखाना उसाला दर जाहीर करत नाही तोपर्यंत कारखाना सुरु करू देणार नसल्याची स्वाभिमानीची भूमिका आहे.

### तेजस्वी घोसाळकरांचा सेनेला जय महाराष्ट्र

**मुंबई :** आगामी महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. अशातच भारतीय जनता पक्षाने उद्धव ठाकरेंच्या शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का दिला आहे. ठाकरे गटाच्या नेत्या तेजस्वी घोसाळकर यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आहे. आज त्या भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या तेजस्वी घोसाळकर यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिली आहे. आज त्या भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून तेजस्वी घोसाळकर या पक्ष सोडणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. काही महिन्यांपूर्वी त्यांनी राजीनामाही दिला होता. त्यानंतर मातोश्रीवर बोलावून त्यांची समजूत काढण्यात आली होती. मात्र आता अखेर एकदा तेजस्विनी घोसाळकर यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला आहे.

### 'मराठी माणसा मुंबई वाचवा'चे बॅनर

**मुंबई :** संपूर्ण मुंबईत लावलेल्या एका बॅनरची जोरदार चर्चा रंगलीय. मराठी माणसा मुंबई मुंबई वाचव अशा आशयाचे बॅनर सध्या लक्षवेधी ठरतायत. पायाखालची जमीन एकदा गेली की ती परत मिळत नसते, मराठी माणसा मुंबई वाचव अशा आशयाचे फलक मुंबईत लावण्यात आलेत. मुंबई मनपा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सध्या वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे. मराठी माणसाने हे बॅनर लावल्याचा दावा मनसेनं केलाय. त्यामुळे हे बॅनर नेमके लावले कुणी याबाबत चर्चा रंगल्या आहेत.

### 'आमचा तालुका बिबटेमुक्त करा', संगमनेरमध्ये जनआक्रोश मोर्चा

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यात बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या विरोधात जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शहरासह तालुक्यातील विविध गावांतील नागरिक, शेतकरी, महिला आणि युवक मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाले होते. हा मोर्चा थेट संगमनेर प्रांताधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चात आमदार सत्यजित तांबे आणि जयश्री थोरात यांनी सहभाग घेतला होता. गेल्या काही महिन्यांत बिबट्यांच्या हल्ल्यात अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असल्याचा संताप मोर्चेकऱ्यांनी व्यक्त केला. बिबट्यांच्या वाढत्या दहशतीमुळे शेतकरी रात्री शेतात जाण्यास घाबरत असून नागरिकांचे जगणे मुश्किल झाले आहे. विशेषतः शाळकरी मुलांवर बिबट्यांचे हल्ले वाढले असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

### राज्यात थंडीची लाट, महाराष्ट्र गारठला

**मुंबई :** राज्यात सध्या तापमानाचा पारा घसरला असून, संपूर्ण महाराष्ट्र थंडीने कुडकुडत आहे. राज्यात थंडीची लाट असून, अनेक शहरांचा पारा १० अंशांवर पोहोचला आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे मुंबईसह महाराष्ट्र गारठला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, नाताळपर्यंत वातावरण असंच राहणार आहे. यामुळे महाराष्ट्राला पुढील काही दिवस थंडीची सामना करावा लागणार असल्याचं तज्ज्ञांनी सांगितलं आहे. सोमवारी, मंगळवारी किमान तापमानात किंचित वाढ होईल.

# महापालिकेच्या निवडणुकीचं बिगुल वाजलं

## मुंबई-ठाण्यासह २९ महापालिकांसाठी निवडणुका जाहीर; १५ जानेवारीला मतदान

**मुंबई :** गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात मुंबई महानगपालिका निवडणुकीची चर्चा आहे. या निवडणुकीची कधी घोषणा होणार, याची सर्वांनाच प्रतीक्षा लागली आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीची कधीही घोषणा होण्याची शक्यता लक्षात घेता राज्यातील सर्वच महत्त्वाचे पक्ष कामाला लागले होते. शिवसेनेचा शिंदे गट आणि ठाकरे गट आणि भाजपा या तिन्ही पक्षांसाठी ही निवडणूक चांगलीच प्रतिष्ठेची आहे. त्यामुळेच काहीही झालं तरी ही निवडणूक जिंकायचीच असा प्रणच या पक्षांनी केला आहे. दरम्यान, ही निवडणूक कधी लागते, असे विचारले जात असतानाच निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन मुंबई पालिकेच्या निवडणुकीची तारखी अखेर जाहीर केली आहे. निवडणूक आयोगाच्या घोषणेनुसार आता मुंबईत महानगरपालिकेची निवडणूक १५ जानेवारी २०२६ या तारखेला होणार असून निकाल १६ जानेवारी रोजी लागणार आहे.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी मतदारांना एकच मत द्यावे लागेल. सोबतच



मुंबईत एकूण १० हजार १११ मतदार केंद्र असतील. मुंबईमध्ये ११ लाख दुबार मतदार आढळले आहेत. या मतदारांना तुम्ही नेमकं कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार, असे विचारण्यात येईल. तसेच या दुबार मतदारांच्या नावापुढे डबल स्टार असे नमूद असेल.

काल (१५ डिसेंबर) राज्य निवडणूक आयोगाने अधिकृतपणे पत्रकार परिषद घेऊन मुंबई पालिकेच्या निवडणुकीची घोषणा केली आहे. या घोषणेनुसार आता मुंबई पालिकेच्या

**नामनिर्देशन पत्र स्वीकारणे - २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर, अर्जाची छाननी - ३१ डिसेंबर, उमेदवारी माघारीची मुदत - २ जानेवारी, चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी - ३ जानेवारी, मतदान - १५ जानेवारी, निकाल - १६ जानेवारी.**

निवडणुकीसाठीचे मतदान १५ जानेवारी या तारखेला होणार आहे. तर मतमोजणी १६ जानेवारी २०२६ या तारखेला केली जाईल. निकालही याच दिवशी घोषित केला जाईल. निवडणूक लढवण्याची इच्छा असणाऱ्या उमेदवारांना २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ या काळात अर्ज करता येतील. तर २ जानेवारी २०२६ या तारखेपर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. निवडणूक आयोग ३१ डिसेंबर २०२५ या तारखेपर्यंत अर्जांची छाननी करेल.

मुंबईत एकूण २२७ जागांसाठी ही निवडणूक आयोजित केली जाईल. या सर्व जागा जिंकण्यासाठी तसेच मुंबई महापालिका निवडणुकीत आपलाच विजय व्हावा यासाठी राजकीय डावपेच आखले जात आहेत. एकनाथ शिंदे यांची शिवसेना, भाजपा आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष असे तिन्ही पक्ष एकत्र येऊन ही निवडणूक लढवणार आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडीत काहीशी फूट पडल्याचे दिसून येत आहे. काँग्रेसने आम्ही स्वबळावर निवडणूक लढवणार असे सांगितले आहे. महाविकास आघाडीचा भाग असलेल्या ठाकरे यांचा शिवसेना पक्ष मनसेसोबत युती करून ही निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेमकं काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**कोणत्या महापालिकांचा समावेश?**

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण डोंबिवली, भिवंडी निजामपूर, मिरा भाईंदर, वसई विरार, पनवेल, नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, मालेगाव, पुणे, पिंपरी चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाडा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर या ठिकाणी महापालिकांची निवडणूक होणार आहे.

दरम्यान उमेदवरांना आपले उमेदवारी अर्ज हे ऑफलाईन पद्धतीनेच भरावे लागणार आहेत, तसेच ज्यांचं दुबार मतदान आहे, त्यांच्या नावापुढे स्टार करण्यात आलं आहे, अशा नागरिकांना केवळ एकाच मतदान केंद्रावर मतदान करता येईल, असंही यावेळी निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

# चिमुकलीवर अत्याचार करून खून

**पिंपरी :** घरात कोणी नाही, हे हेरून ओळखीच्याच नराधमाने संध्याकाळच्या सुमारास चिमुरडीला चॉकलेटचं आमिष दाखविलं. घरापासून अर्ध्या किलोमीटरवर निर्जनस्थळी नेले. चिमुकलीवर बलात्कार केला. गळा आवळून खून केला. या घटनेने उर्सेसह मावळ परिसर हादरला आहे. ओळखीच्या व्यक्तीनेच उर्सेत शेजारी राहणाऱ्या व्यक्तीनेच घात केल्याचे तपासात समोर आले आहे. गुंडाविरोधी पथकाने १२ तासांत नराधमाच्या मुसक्या आवळल्या आहेत. या घटनेनं परिसरात संताप व्यक्त होत आहे.

मावळातील उर्स या परिसरात मोठ्या प्रमाणावर कामासाठी आलेल्या लोकांची मोठी गर्दी आहे. त्यामुळे या भागात कामगार कष्टकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास आहे. शनिवारचा दिवस एका कामगार कुटुंबासाठी घातवार ठरला. उर्सेत एका ठिकाणी आई-वडील आणि दोन भावंडे असे कामगार कुटुंब राहण्यासाठी आलेलं होतं. आई-वडील हे दोघेही पोट भरण्यासाठी कामावरती गेले होते तर सहा वर्षांची मुलगी आणि आठ वर्षांचा मुलगा अशी दोन्ही मुले घरातच होती.

रात्री आई कामावरून घरी आल्यानंतर मुलगी घरात नसल्याचं दिसून आलं आणि शोधाशोध सुरू झाली. बराचवेळ शोधल्यानंतरही चिमुकली न सापडल्याने त्यांनी शिरगाव पोलिस स्टेशन गाठलं आणि ही माहिती गुंडा विरोधी पथकास मिळाली. पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे.




**पुणे :** पुणे पोलीस आयुक्त यांच्यातर्गत नव्याने तयार झालेल्या पोलीस उपायुक्त कार्यालय, सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय आणि पोलीस स्टेशनचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

# राजगुरूनगरमध्ये खासगी क्लासमध्येच गँगवार

**पुणे :** पुण्यात अल्पवयीन मुलांमध्ये झालेल्या भयानक गँगवॉर झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पुण्याजवळील राजगुरुनगरमधील एका खासगी क्लासमध्ये विद्यार्थ्याचा चाकूने

### विद्यार्थ्यांनी शिक्षकासमोरच विद्यार्थ्याचा गळा चिरला

वार करुन खून केल्याची घटना समोर आली आहे. इयत्ता दहावीच्या वर्गात शिक्षक शिकवत असतानाच बेंचवर बसलेल्या एका विद्यार्थ्यावर त्याच्याच क्लासमधील विद्यार्थी मित्राने हल्ला केला. ज्यात गंभीर जखमी झालेल्या मुलाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. तसेच खासगी कोचिंग क्लासमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

राजगुरुनगर येथील संस्कार कोचिंग क्लासेसमध्ये दुपारच्या सुमारास ही भयानक घटना घडली. या क्लासमध्ये इयत्ता दहावीचा क्लास सुरू असताना एका अल्पवयीन विद्यार्थ्याने अचानक आपल्या क्लासमेटवर चाकूने हल्ला केला. यावेळी



आरोपी विद्यार्थ्याने मृत विद्यार्थ्याच्या गळ्यावर आणि पोटात चाकूने अनेक वार केले. रक्तबंबाळ झालेल्या विद्यार्थ्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. हल्ला करणारा विद्यार्थी या घटनेनंतर दुचाकीवरून तात्काळ फरार झाला.

या घटनेची माहिती मिळताच राजगुरुनगर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक टीमनेही घटनास्थळी भेट दिली आणि तपास सुरू केला. पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, खाजगी कोचिंग क्लासमध्ये ही घटना घडली आहे. आरोपी आणि मृत यांच्यात जुना वाद होता का, या दिशेने आम्ही तपास करत आहोत. अजून तपास करणे गरजेचे आहे. सध्या पोलिसांनी शाळा सुटल्यानंतरही परिसरात पेट्रोलिंग सुरू केले आहे. आरोपी आणि मृत विद्यार्थी दोघेही अल्पवयीन आहेत. या हल्ल्यामागचे नेमके कारण काय होते, याचा पोलीस कसून शोध घेत आहेत. या भयानक घटनेमुळे राजगुरुनगर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून खासगी कोचिंग क्लासच्या व्यवस्थापनावर आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पालकांमध्ये भीतीचे वातावरण

दरम्यान या घटनेमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अनेक पालकांनी शाळा सुटायच्या वेळी शाळेबाहेर मोठी गर्दी करत पाल्यांना स्वतः घरी घेऊन जात आहेत. या गंभीर प्रकारामुळे शैक्षणिक संस्थांतील सुरक्षा व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळा व क्लासमध्ये कडक नियम लागू करण्याची आणि पोलिसांकडून त्वरित कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# भाजप आणि राष्ट्रवादी विरोधात लढणार

**मुंबई :** आमच्या सरकारने केलेलं काम पाहता मुंबईसह सर्वच ठिकाणी जनतेचा कौल आमच्या बाजूने असेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात सर्वच ठिकाणी एकनाथ शिंदेंची शिवसेना ही भाजपसोबत असेल. तर पुण्यामध्ये, पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी एकमेकांसमोर उभे ठाकेल, पण ही मैत्रीपूर्ण लढत असेल असं मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे, तर १६ जानेवारी रोजी त्याचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे सर्वच पक्षांनी आता कंबर कसल्याचं दिसून येतंय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे काम, तसेच महायुती सरकारने केलेले काम पाहता आम्हाला संधी मिळेल असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात बहुतांश ठिकाणी भाजप आणि शिवसेना एकत्र लढणार आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये मात्र भाजप आणि अजितदादांची राष्ट्रवादी एकमेकांच्या विरोधात लढणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. फडणवीस म्हणाले की, पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये अजितदादांची राष्ट्रवादी आणि भाजप हे एकत्र लढू शकणार नाहीत. त्यावर अजितदादांशी चर्चा झाली आहे. आम्ही जर एकत्र लढलो तर त्याचा फायदा हा विरोधकांना होणार हे इतकं राजकारण आम्हाला दोघांनाही समजतं. त्यामुळे दोन्ही पक्ष एकमेकांच्या विरोधात लढणार असून ती मैत्रीपूर्ण लढत असेल.

# सिल्लोड येथील 'ते' जन्म नोंदणी प्रमाणपत्रे अखेर रद्द

**सिल्लोड :** सिल्लोड तालुक्यातील १९२ जन्म नोंदणी अर्जातील जन्मस्थळ आणि जन्म तारीख संदर्भात शैक्षणिक कागदपत्रांचा अभाव असल्याचा ठपका ठेवून शुक्रवार (दि.१२ डिसेंबर) रोजी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांनी ४१३ जणांचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश दिले. तसेच संबंधित जन्म-मृत्यु निबंधक यांना या जन्म प्रमाणपत्राची नोंद तात्काळ सीआरएस पोर्टलवरून कमी करून मुळ जन्म प्रमाणपत्र परत घेण्याचे आदेशात म्हटले आहे.

सिल्लोड तालुक्यातील नागरिकांनी प्रलंबित जन्म नोंदणी प्रमाणपत्र सिल्लोड उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाने संबंधित ग्रामपंचायत कार्यालय व नगरपरिषद कार्यालयातून मागील काळात हस्तगत केले होते. मात्र भाजप चे माजी खासदार किरीट सोमैया यांनी सिल्लोड महसूल प्रशासनाकडे माहितीच्या अधिकारात सदर जन्म नोंदणी अर्जातील जन्माच्या कागदपत्र संदर्भात माहिती मागितली होती. या माहितीनुसार २६३४ अर्जाबाबत बाबत त्यांनी संशय व्यक्त केला होता. याची सिल्लोड उपविभागीय अधिकारी यांनी तात्काळ दखल घेत उपविभागीय अधिकारी कार्यालयातून वितरीत झालेल्या सर्व जन्म प्रमाणपत्राच्या अर्ज संचिकांची सुक्ष्म तपासणीत करुन अर्जाच्या संचिकेतील जन्मस्थळ व जन्म तारीख संदर्भात पुरावा दर्शविणाऱ्या कागदपत्रांची पडताळणी केली. या पडताळणीत अनेक नागरिकांनी केवळ आधार कार्ड

अपूर्ण व संशयास्पद कागदपत्रे सादर करून जन्म प्रमाणपत्र काढणाऱ्या दोन नागरिकांच्या विरोधात यापूर्वीच सिल्लोड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे याच गुन्ह्यात आज आणखी १९२ आरोपींचा समावेश करण्यात आला आहे.

**- शेषराव उदार पोलीस निरीक्षक सिल्लोड शहर**

च्या आधारावर जन्म प्रमाणपत्र काढले असल्याचे आढळून आले त्यानुसार आधार कार्डच्या आधारावरील ४१३ जन्म प्रमाणपत्र रद्द करण्याचे उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांनी आदेशित केले.जन्म नोंदणी प्रमाणपत्र रद्द केलेल्या मध्ये मुस्लिम समाज



बांधवांची संख्या अधिक आहे.

तालुका महसूल कार्यालय व जिल्हा कार्यालय याच मार्फत जन्म नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज करणाऱ्या खऱ्या नागरिकांना प्रमाणपत्रे मिळू नये म्हणून राज्यकर्ते दबाव टाकतात. त्यामुळे सदर जन्म नोंदणी प्रमाणपत्राची प्रक्रिया अर्धन्यायीक न्यायालयात न करता प्रथमवर्ग प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयातच होणे आवश्यक आहे.

सिल्लोड उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने वाटप करण्यात आलेल्या एकूण २८०० जन्म प्रमाणपत्राची सखोल चौकशी करून जवळपास १००० च्या पेक्षा जास्त नागरिकांवर खोट्या प्रमाणपत्राच्या आधारावर जन्म प्रमाणपत्र मिळविले म्हणून गुन्हे दाखल करण्यासाठी मी पुन्हा दोन आठवडे नंतर सिल्लोडला येणार आहे.

**- किरीट सोमय्या**

### कागदपत्रात त्रुटी आढळल्याने ४१३ जन्म प्रमाणपत्र रद्द

सिल्लोड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या जन्म नोंदणी अर्जातील प्रत्येक कागदपत्रांची फेरतपासणी करण्यात आली असून सदर अर्जात अशिक्षित अर्जदारानी शिक्षण घेतले नसल्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यांच्याकडे जन्म तारखे संदर्भात शैक्षणिक पुरावा नसल्याने व जन्म प्रमाणपत्र काढण्यासाठी केवळ आधार कार्ड हा पुरावा दिलेला असल्याने, एक डिसेंबर २०२५ रोजी शासनाने काढलेल्या नवीन अध्यादेशानुसार असे एकुण ४१३ जन्म नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे. रद्द करण्यात आलेल्या प्रमाणपत्र धारकांनी आपले प्रमाणपत्र उपविभागीय अधिकारी कार्यालयात जमा करावे नसता त्यांचेवर पोलीस कारवाई करण्यात येईल. यासाठी प्रशासनास सहकार्य करावे.

**- लतीफ पठाण उपविभागीय अधिकारी सिल्लोड.**

सोमय्या यांच्या दबावाखाली नोंदणी रद्दची कारवाई

किरिट सोमैया यांच्या दहशतीखाली, भीतीपोटी किंवा सोमैया यांची बोळवण सारण्यासाठी जन्म नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याचा तहसीलदार यांना अधिकार नसताना उदगीर तहसीलदार राम बोरगावकर यांनी बेकायदेशीर रित्या १५१ लाभार्थ्यांचे जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रलंबित रेल्वे प्रश्न तात्काळ सोडवा : खा. डॉ. काळगे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** गेल्या पाच दशकांपासून अधिक काळ प्रलंबित असलेला लातूर रोड ते बोधन रेल्वे मार्गासह रेल्वेशी संबंधित प्रश्नांची सोडवणूक लवकरात लवकर करण्यात यावी, अशी आग्रही मागणी खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी लोकसभेत लावून धरली.

खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी आपल्या मतदार संघातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यात यावी या मागणीसाठी सातत्याने लोकसभेत आवाज उठविण्याचे काम केले आहे. मराठवाड्याचे मागासलेपण पूर्णतः दूर करण्यासाठी मराठवाड्यात रेल्वेचे जाळे निर्माण होणे आवश्यक आहे. मराठवाड्याच्या रेल्वे प्रश्नांकडे आतापर्यंत फारसे गांभीर्याने पाहिले गेले नाही. परिणामतः मराठवाडा आजही विकासापासून दूरच राहिला आहे. लातूर रोड ते बोधन या जवळपास १३५ किमीच्या रेल्वेमार्गासाठी केंद्राने तात्काळ आवश्यक तो निधी मंजूर करून या कामाला सुरुवात करावी, अशी मागणी खा. डॉ. काळगे यांनी लोकसभेत केली. लातूर हे राज्यात शिक्षणाचे माहेरघर म्हणून परिचित आहे. लातूरला संपूर्ण राज्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. शिक्षण व दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी रेल्वेचे जाळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणे अत्यावश्यक असल्याची बाब खा. डॉ. काळगे यांनी निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला.



# सिनेस्टाईल खुनाचा पोलिसांकडून २४ तासात छडा!

## ५७ लाखांच्या कर्ज फेडीसाठी आरोपीने केला स्वतःच्याच मृत्यूचा बनाव; लातूर पोलीस दलाची धडाकेबाज कामगिरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** कुटुंबियांना एक कोटीच्या टर्म इन्शुरन्सच्या रकमेचा लाभ मिळावा या स्वार्थी विचाराने ५७ लाख रुपयांच्या कर्जफेडीसाठी आरोपीने स्वतःच्याच मृत्यूचा बनाव करून एका निरपराध व्यक्तीला यमसदनी पाठविल्याच्या घटनेचा उलगडा लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सोमवारी तातडीच्या पत्रकार परिषदेत बोलताना केला. सिनेस्टाईल घडलेल्या या घटनेचा लातूर पोलिसांनी अवघ्या २४ तासात छडा लावण्याचे काम केले आहे. पोलिसांच्या या धडाकेबाज कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

शनिवारी मध्यरात्री औसा - तुळजापूर महामार्गावरील वानवडा रस्त्यावर एका कारमध्ये (कार क्रं. एमएच ४३ - ए बी ४२००) एका तरुणाचा जाळून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी कारमधील गणेश गोपीनाथ चव्हाण, रा. विठ्ठलनगर, औसा वय ३५ वर्षे हाच मृत झाल्याचा प्रथमदर्शनी अंदाज वर्तवला गेला होता. कारण जळालेल्या वाहनानजीक पोलिसांना गणेश हातात वापरत असलेले कडे




आढळून आल्याने मृत व्यक्ती गणेशच असावा, असा पोलिसांचा संशय होता. मात्र, या प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला असता सदर प्रकार दर्शविण्याचा प्रयत्न केला गेला आहे, त्यापेक्षा निश्चितच वेगळा असल्याची खात्री पटली.

पोलिसांनी तपासाची सूत्रे गतिमान केली असता हा प्रकार कार जळून मृत झाल्याचा नसून खुनाचा असल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले.

आपण कारमध्ये जळून मयत झालो आहे, याचा बनाव करणारा गणेश चव्हाण हा एका फायनान्स कंपनीत कामाला आहे. तसेच त्याने स्वतःचा एक कोटी रुपयांचा टर्म इन्शुरन्सही काढला होता. त्याच्यावर ५७ लाख रुपयांचे कर्ज झाले होते. हे कर्ज कसे फेडायचे यासाठी तो मागच्या एक महिन्यापासून आत्महत्या करायची की एखाद्या व्यक्तीचा खून दतो स्वतःच असल्याचा बनाव करायचा याचा विचार करत होता.

शनिवारी रात्रीच्या दहाच्या सुमारास तो आपली गाडी घेऊन याकतपूर रोडला आला असता, त्याला गोविंद किशन यादव (वय ५० वर्षे) रा. पाटील गल्ली, औसा याने हात दाखवून लिफ्ट मागितली. त्यावेळी गोविंद यादव पूर्णपणे दारूच्या नशेत होता. लिफ्ट मागून गोविंद यादव गाडीत बसल्यावर आरोपी गणेशच्या डोक्यात त्याचाच खून करुन स्वतः कारमध्ये जळून मयत झाल्याचा बनाव करण्याचे खूळ आले. त्याप्रमाणे त्याने गोविंद यादवला चालकाच्या सीटवर बसवून हा सर्व बनाव केला, असे अमोल तांबे यांनी सांगितले.

पोलिसांना वानवडा रस्त्यावर एक कार जळत असल्याची माहिती मिळाल्यावरून तपासाची सूत्रे फिरली. या प्रकरणी संशय आल्याने वास्तव काय आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता आरोपी गणेश चव्हाण याने हा सगळा बनाव केल्याचे कबूल केले. गणेशला स्थानिक गुन्हे शाखा व औसा पोलिसांनी रविवारी रात्री उशिरा कोकणातील सिंधुदुर्गमधून ताब्यात घेतले असून त्याने या खुनाची कबुलीही दिल्याचे पोलीस अधीक्षक तांबे यांनी सांगितले.

एखाद्या हिंदी चित्रपटात शोभेल असा प्रकार आरोपीकडून घडला आहे. या प्रकरणी औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, सहा. पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, औसा पोलीस निरीक्षक रेवणनाथ ढमाले, पोलीस उपनिरीक्षक अतुल डाके, भाऊसाहेब माळवदकर यासह अर्जुन राजपूत, महादेव बिलापट्टे, युवराज गिरी, तुराब पठाण, रामलिंग शिंदे, नवनाथ हासबे, सर्जेराव जगताप, राजेश कंचे, श्रीनिवास जोंधळे, मोतीराम घुले, रामकिशन गुट्टे, मुबाज सय्यद, हणमंत पडिले, दिनेश गवळी, अशोक राठोड, रतन शेख, येनकुरे, महेश मर्डे, बालाजी चव्हाण, भरत भुरे, महेश क्षीरसागर, सोमनाथ खडके, बालिका सरवदे, सदाशिव दंतुरे, सचिन मंदाडे, भागवत मोरे, सूर्यकांत मगर, गोविंद पाटील, सायबर पोलीस ठाण्याचे शैलेश सुडे, अंजली गायकवाड या पोलीस कर्मचाऱ्यांनी धाडसी कामगिरी केली.


या पोलीस अधिकारी - कर्मचाऱ्यांना रिवॉर्डने सन्मानित केले जाणार असल्याचे पोलीस अधीक्षक तांबे यांनी सांगितले.

---

## मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्कारासाठी ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** पुरोगामी व क्रांतीकारी समाजवादी नेते मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्कार यंदा सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांना प्रदान केला जाणार आहे. माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने काल ही घोषणा केली. पुरस्कार वितरण समारंभ लातूर येथे रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. तसेच या समारंभात प्रशांत भूषण 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने' या विषयावर व्याख्यान देतील.



**लातुरात २१ डिसेंबर रोजी वितरण समारंभ**

मनोहरराव गोमारे पुरोगामी विचारमंच, लातूर तर्फे हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी पुरस्काराचे दुसरे वर्ष असून गेल्या वर्षी स्वराज इंडियाचे संयोजक व भारत जोडो अभियानाचे राष्ट्रीय संयोजक योगेंद्र यादव यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पन्नास हजार, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून मनोहरराव गोमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तो दिला जातो.

माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने काल एकमताने अ‍ॅड. प्रशांत भूषण यांची निवड केली. निवड समितीमध्ये सर्वश्री प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, माधव बावगे प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, शिवाजी शिंदे, उदय गवारे, सूर्यकांत वैद्य, डॉ. बी. आर. पाटील, दिलीप आरळीकर, श्याम जैन, डॉ. कोमल गोमारे, अ‍ॅड. विश्वास मोमले, डॉ. गणेश गोमारे यांचा समावेश आहे.

---

## एकाच दिवसात २ लाख १२ हजार ५०० रु.ची दंड आकारणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** लातूर शहरातील वाहनांना शिस्त लावण्यासाठी शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून विशेष मोहिम राबविण्यात येत असून रविवारी एकाच दिवसात २ लाख १२ हजार ५०० रु.ची दंड आकारणी करण्यात आली आहे. दुचाकीवर ट्रिपल सीट जाणाऱ्या तसेच बुलेटला कर्णकर्कश हॉर्न लावून चालणाऱ्या वाहनांवरही कठोर कारवाई केली जात आहे. लातुरातील वाहनधारकांना शिस्त लावण्याच्या उद्देशाने सदर मोहिम राबविली जात आहे.

लातूर शहरातील वाहतूक व्यवस्था मागच्या काही दिवसात अत्यंत बेशिस्त झाल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. दुचाकीवरून ट्रिपल सीट प्रवास , तोही चक्क



वाहतूक पोलिसांच्या समोरून करणाऱ्यांचीही संख्या वाढली होती. याबाबत पोलीस प्रशासनाने आता कडक धोरण अवलंबले आहे. शहरात ऑटोचालक आपल्या पुढील सीटवर प्रवाशी बसवून घेणे, गणवेश परिधान न करणे, रस्त्यावर अचानक कोठेही ऑटो थांबवून प्रवाशी चढ - उतार करणे, चौका - चौकामध्ये वळणावर प्रवासी घेण्यासाठी घेण्यासाठी ऑटोची दुहेरी रांग करून थांबणे, या सारख्या कारणावरून सामान्य नागरिक त्रस्त झाले होते. त्यांनी याबाबत पोलीस प्रशासनाकडे तक्रारी केल्या जात होत्या.

**लातूर शहर वाहतूक पोलिसांची विशेष मोहिम; ऑटोचालकांविरुद्ध ई - चलान मशिनद्वारे दंडात्मक कारवाई**

त्यामुळे शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनखाली व वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वात ही विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

रविवारी, दि. १४ डिसेंबर रोजी बेशिस्त वाहने चालविणाऱ्या अनेक वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली. विविध कारणावरून एकाच दिवशी तब्बल १२४ऑटो चालकांवर केसेस करून त्यांच्याकडून १ लाख ६ हजार ५०० रुपयांची दंड आकारणी करण्यात आली. तर क्षमतेपेक्षा अधिक गतीने वाहने चालविणाऱ्या वाहनांवर एकूण ५३३ केसेस करण्यात आल्या असून त्या माध्यमातूनही लाख ६ हजार रुपयांची दंड आकारणी केली गेली आहे. ही मोहीम यापुढील काळातही चालूच ठेवली जाणार आहे. ज्या ऑटोचे अनपेड ई चलान भरणे थकीत आहे त्यांच्याविरुद्ध न्यायालयात खटले दाखल करण्यात येत आहेत. शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्याच्या उद्देशाने सदर मोहिम राबविली जात आहे.

---

## डॉ. यतिशकुमार जोशींच्या रिसर्च पोस्टरला प्रथम पुरस्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** इंडियन ऑर्थोडोंटिक सोसायटी यांच्या वतीने ५९ वी राष्ट्रीय ऑर्थोडोंटिक परिषद नुकतीच विशाखापट्टणम येथे घेण्यात आली. या परिषदेत लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्रचार्य तथा ऑर्थोडोंटिक तज्ज्ञ प्रा. डॉ. यतिशकुमार जोशी यांनी सादर केलेल्या रिसर्च पोस्टरला प्रथम पुरस्कार मिळाला आहे.

विशाखापट्टणम येथे पार पडलेल्या तीन दिवशीय राष्ट्रीय ऑर्थोडोंटिक परिषदेत डॉ. यतिशकुमार जोशी यांनी परिषदेच्या तिसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात शिक्षक प्रवर्गात 'डीएमआयएमएस सुधारित एईटीकॉम मॉड्यूलद्वारे



दंत विद्यार्थ्यांच्या संज्ञानात्मक क्षेत्रात प्रशिक्षणाच्या परिणामाचे मूल्यांकन' या विषयावर रिसर्च पोस्टर सादर केले. या रिसर्च पोस्टर साठी डॉ. जोशी यांना प्रथम पुरस्कार मिळाला असून मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, डॉ. आनंद आंबेकर, डॉ. गणेश डांगे व एम.डी.एस. ऑर्थोडोंटिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी डॉ. दिशा खंदाडे, डॉ. रिया गाला, डॉ. सुमित होनराव, डॉ. गजानन वाघमोडे, डॉ. अनिरुद्र जगताप, डॉ. श्रीकांत श्रृंगारे, डॉ. ऋषभ बागडिया, डॉ. पृथ्वीराज करहाळे, डॉ. अजित सोमवंशी यांनी सहभाग नोंदवला.

या यशाबद्दल डॉ. यतिशकुमार जोशी यांचे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांच्यासह एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉक्टर व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

---

## विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या वरवंटी शिवारात एका २५ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली आहे. या आत्महत्या प्रकरणी मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या कारणावरून पतीसह सासऱ्याविरुद्ध एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, वरवंटी गावालगत असलेल्या गोकुळनगर, रायवाडी रोड लातूर या ठिकाणी राहणारी विवाहिता आरती रामेश्वर उरगुंडे ( २५ वर्षे ) हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन पती रामेश्वर सिद्धेश्वर उरगुंडे हा तिचा शारीरिक व मानसिक छळ करत असे. तिने पतीकडे काहीही मागणी केली की तिला माहेरहून आणा असे सांगून देणे टाळत असे. तसेच चारित्र्याच्या संशयावरून आरतीला मारहाणही करत असे. आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या नवऱ्याच्याच मोबाईलमध्ये आरतीला शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी तिचा नवरा दुसऱ्या महिलेशी बोलतानाचे चॅटिंग सापडले.

ही बाब लक्षात येताच आरतीने रामेश्वरला याचा जाब विचारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तुला काय करायचे ते कर असे सांगून रामेश्र्वरने आरतीला पुन्हा मारहाण केली. या नवरा बायकोचे भांडण सोडविण्यासाठी आरतीचे वडील राजेंद्र दरेकरही आले व त्यांनी दोघांनाही समजावून सांगितले.

वडिलांनी समजावून सांगितल्यानंतरही आरतीचा त्यांना अजूनही पती मारहाण करत असल्याचा फोन आला. आरतीचा फोन आल्याबरोबर तिचे वडील लगेच तिच्या घरी गेले. पण त्यावेळी आरतीने स्वतःला एका खोलीत कोंडून घेतले होते. पती रामेश्वरनेही दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत आरतीने स्वतःला गळफास लावून आत्महत्या केली होती.

आपल्या मुलीने आत्महत्या केल्याचे पाहताच दरेकर यांनी तात्काळ एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून रामेश्वर सिद्धेश्वर उरगुंडे व सासरा सिद्धेश्वर रानबा उरगुंडे या दोघांविरुद्ध तक्रार दाखल केली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक तपास करत आहेत.

---

## जि.प. शाळेत जनजागृती अभियानास प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या सोनवती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकताच बाळ सुरक्षा, बालहक्क, कायदे, शारीरिक व मानसिक अत्याचाराविषयी जनजागृतीविषयक अभियान राबविण्यात आले. या अभियानास उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी एड. सुजाता माने, एड. सरोजा पवार, पोलीस कर्मचारी काळे, मुख्याध्यापक संजय वाडकर, डॉ. स्मिता मामिलवाड, कल्पना कोरे, छाया पवार यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना एड. सुजाता माने यांनी बाल सुरक्षितता, बाल संरक्षणात तरतुदींची माहिती दिली. अ‍ॅड. सरोजा पवार यांनी बाल अधिकार, अत्याचारांचे प्रकार आणि पोलिसांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. या उपक्रमास अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाला.

---

## शहर जिल्हा भाजपाने घेतल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिकेच्या निवडणूक लवकरच होऊ घातल्या आहेत. त्या अनुषंगाने लातूर शहर जिल्हा भाजपाने निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांचे अर्ज मागितले होते. या प्रक्रियेला मोठा प्रतिसाद मिळाला असल्याने ९०० पेक्षा अधिक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती शहर जिल्हा भाजपाच्यावतीने पार पडल्या आहेत.

महानगरपालिका निवडणूकीचे वेध सर्वांनाच लागले असून लातूर शहर जिल्हा भाजपाने या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. निवडणूकीसाठी उमेदवारांची निवड सर्वात कठीण प्रक्रिया आहे. प्रदेश भाजपने दिलेल्या सूचनेनुसार शहर जिल्हा भाजपने मनपा निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांचे अर्ज शहर जिल्हा भाजपा कार्यालयात दाखल करण्यास सांगितले होते. याकरिता शहरातील इच्छुकांनी मोठा प्रतिसाद देत ७० जणांसाठी ९०० पेक्षा अधिक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. ज्या इच्छुकांनी पक्षाकडे अर्ज दाखल केले आहेत त्यांच्या मुलाखती घेण्याच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर शहर भाजपाने त्या इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. या मुलाखतीसाठी प्रत्येकी दोघांचे असे चार पॅनल नियुक्त करण्यात आले होते. यामध्ये माजी खा. डॉ. सुनील गायकवाड, माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, देविदास काळे, प्रेरणा होनराव, सुधीर धुत्तेकर शैलेश गोजमगुंडे, दिपक मठपती, आदींचा समावेश होता. या मुलाखती ईशान स्क्वेअर येथे घेण्यात आल्या आहेत.

या मुलाखतींमध्ये इच्छुकांना कोणते




प्रश्न विचारायचे आणि त्यांच्याकडून कोणती माहिती घ्यायची याबाबत प्रदेश भाजपने सूचना केल्या होत्या. त्या सूचनेनुसार मुलाखत घेणारी इच्छुक उमेदवारांकडून प्रश्नांची उत्तरे जाणून घेत त्यांच्याकडून



आवश्यक असणारी माहिती संकलित केली.

मुलाखत देण्यासाठी आलेले इच्छुक मोठ्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने मुलाखतीस सामोरे जाताना दिसले. मुलाखतीला येताना कोणतेही शक्तीप्रदर्शन करू नये अशा सूचना दिल्यामुळे हि प्रक्रिया अतिशय शांततेत पार पडली.

मुलाखती घेतल्यानंतर या सर्व उमेदवारांची माहिती प्रदेश भाजपकडे पाठवण्यात येणार असून या नंतर प्रदेशच्या वतीने उमेदवार निवडीसाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार निकषात बसणाऱ्या पात्र उमेदवारींची निश्र्चिती होईल आणि त्यानंतर प्रदेशकडूनच उमेदवारींची घोषणा होईल असे शहर जिल्हा भाजपाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...



**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सचिव, तथा सह प्रभारी आंध्रप्रदेश सुनील देवधर हे छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर आले असता भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी प्रवीण घुगे, मनोज शेवाळे, यज्ञेश बसैय्ये यांची उपस्थित होते.

### शासकीय शाळांमधील विज्ञान शिक्षणाला बळकटी

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आपल्या कर्मचारी स्वयंसेवक कार्यक्रमांतर्गत ३५व्या आय केअर उपक्रमाची यशस्वी पूर्तता झाल्याची घोषणा केली. समावेशक शिक्षण आणि समुदाय विकासाला चालना देण्याच्या टोयोटाच्या प्रवासातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. टीकेएमच्या सातत्यपूर्ण सुधारणा (कायझेन), लोकांप्रती आदर आणि शाश्वत विकासाबाबतच्या कटिबद्धतेच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत असलेला हा उपक्रम शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान शिक्षण अधिक सक्षम करण्यावर केंद्रित आहे. केंगेरी एज्युकेशनल ट्रस्टद्वारे व्यवस्थापित केंगेरी हायस्कूलमध्ये १४ डिसेंबर रोजी आयोजित या कार्यक्रमात ५०० हून अधिक टीकेएम कर्मचारी, त्यांचे कुटुंबीय, विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

### नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोलार एनर्जीसोबत सामंजस्य करार

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने आज नवी दिल्लीमधील एमएनआरई मुख्यालयामध्ये नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय (एमएनआरई) अंतर्गत नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोलार एनर्जी सोबत सामंजस्य करार केला. या करारासह भारताच्या नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशन आणि दीर्घकालीन कार्बन-न्यूट्रॅलिटी महत्त्वाकांक्षांना चालना मिळाली आहे. या धोरणात्मक सहयोगाचा भाग म्हणून टोयोटा किर्लोस्कर मोटरने भारतातील ड्रायव्हिंग व हवामान स्थितींमध्ये व्यापक वास्तविक व्यवहार्यता आणि कामगिरी मूल्यांकनासाठी एनआयएसईला आपली हायड्रोजन फ्यूएल-सेल इलेक्ट्रिक वेईकल 'टोयोटा मिराई' सुपूर्द केली.

### पिरामल फायनान्स लिमिटेडची महाराष्ट्रभर मोठ्या विस्ताराची घोषणा

**मुंबई** : पिरामल फायनान्स लिमिटेडने आज महाराष्ट्रभर मोठ्या विस्ताराची घोषणा केली असून आर्थिक वर्ष २०२८ पर्यंत एकूण १.५ लाख कोटी रुपये एयूएम गाठण्याचे चे लक्ष्य ठेवले आहे. महाराष्ट्र पिरामल फायनान्ससाठी सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक असून राज्यातील प्रमुख शहरांमध्ये ७७ शाखांच्या मदतीने १,२१,००० हून अधिक ग्राहकांना सेवा पुरवली जाते. राज्यात गृहकर्जे आणि बिझनेस लोन्ससाठी विशेषतः मोठी मागणी दिसून येत आहे. कंपनीने आपल्या प्रमुख मोहिमेच्या पुढील टप्प्याचे अनावरणही केले 'हम काग़ज़ से ज़्यादा नीयत देखते हैं, ज्यामध्ये भारतभरातील कुटुंबे आणि लहान उद्योजकांच्या आकांक्षा अधोरेखित करणारी तीन नवीन फिल्म्स समाविष्ट आहेत.

### एक चांगली निवड पुढचे निर्णय सोयीचे बनवते

**छत्रपती संभाजीनगर :** आज तुम्ही चहा मध्ये साखर टाकाल की नाही? ब्रिटानिया न्यूट्रीचॉईस हा भारतातील एक आघाडीचा बिस्किट ब्रँड आहे. या ब्रँडने अशा रोजच्या आयुष्यातील छोट्या पण चांगल्या निवडींबाबत एका नव्या संवादाची सुरुवात केली आहे. एक चांगला निर्णय पुढचा चांगला निर्णय घेणं सोपं करतं हा या संवादाचा गाभा आहे. एक साधीशी कल्पना तुमच्या पुर्ण दिवसावर एखादा छोटासा निर्णय कसा प्रभाव टाकतो, हे यातून कळतं. ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आमिर खान आता ब्रँडचा चेहरा म्हणून पुढे आले आहेत.

### जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने सर्व-नवीन हेक्टर लाँच केली


**पुणे :** जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने आज ऑल-न्यू एमजी हेक्टरच्या लॉन्चची घोषणा केली, जी एसयूव्ही सेगमेंटमध्ये ठळक डिझाइन, अतुलनीय आराम, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि डायनॅमिक ड्रायव्हिंग अनुभवाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ऑल-न्यू हेक्टरमध्ये नवीन पुढील आणि मागील बंपर डिझाइन, सर्व-नवीन ग्रिल डिझाइन, नवीन अलॉय व्हील्ससह एक आकर्षक बाह्यरूप आहे आणि दोन नवीन रंग - सेलाडॉन ब्लू आणि पर्ल व्हाइटमध्ये उपलब्ध आहे. इंटिरियर्समध्ये ५-सीटर ट्रिमसाठी ड्युअल टोन आइस ग्रे थीम आणि ६ आणि ७-सीटर ट्रिमसाठी ड्युअल टोन अर्बन टॅन थीम आहे, ज्यामुळे केबिनला अधिक प्रीमियम आणि आकर्षक स्वरूप मिळते.

### लठ्ठपणा, टाइप २ मधुमेहाच्या उपचारांसाठी युरपीक लाँच

**छत्रपती संभाजीनगर :** सिप्ला लिमिटेडने देशातील सर्वात गंभीर आरोग्य आव्हानांपैकी दोन-लठ्ठपणा आणि टाइप २ मधुमेह यांना व्यवस्थापित करण्यासाठी आठवड्यातून एकदा इंजेक्शनने देण्यायोग्य थेरपी-युरपीकएँ आज लाँच करण्याची घोषणा केली. भारतात लिलीच्या टिर्झेपॅटाइडचा दुसरा ब्रँड-युरपीकएँ चे वितरण आणि प्रचार करण्याचे अधिकार सिप्लाकडे आहेत. या लाँचबद्दल बोलताना, सिप्ला लिमिटेडचे ग्लोबल चीफ ऑपरेटिंग ऑफिसर अचिन गुप्ता म्हणाले: युरपीकएँ चे लाँचिंग हा लठ्ठपणा आणि टाइप २ मधुमेह या भारतातील आरोग्यावरील मोठे ओझे असणाऱ्या दोन दीर्घकालीन आजारांविरुद्धच्या लढाईत एक परिवर्तनकारी क्षण आहे. सिप्ला या क्षेत्रात आमचे दीर्घकालीन आजार आणि श्वसन उपचारांमधील नेतृत्व परिभाषित करते त्याच कौशल्य आणि वैज्ञानिक वचनबद्धतेसह प्रवेश करत आहे. लिलीसोबतच्या आमच्या सहकार्याद्वारे जागतिक स्तरावर बेंचमार्क केलेल्या, भविष्यासाठी तयार असलेल्या उपचारपद्धतींमध्ये प्रवेश वाढवण्यावर आमचे लक्ष केंद्रित आहे, जे नवीन उपक्रम, उद्देश यांना एकत्र आणते जेणेकरून रुग्णांना ते कुठेही असले तरी अत्याधुनिक उपचार मिळतील याची खात्री होईल.

### धनंजय चिंचोलीकर यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी तरुण भारतचे माजी पत्रकार, साहित्यिक व विनोदी लेखक धनंजय ऊर्फ बब्रुवान चिंचोलीकर यांचे दुःखद निधन झाले. तरुण भारतमध्ये काम करताना त्यांनी आपल्या वेगळ्या लेखनशैलीनं वाचकांमध्ये खास



ओळख निर्माण केली होती. ग्रामीण मराठवाडी भाषेला इंग्रजी शब्दांची फोडणी देत त्यांनी 'बब्रुवान रुद्रकंठावर' हे सदर गाजवले. 'अक्षर' पुरवणीच्या विस्तारात त्यांचा मोठा वाटा होता. न-मुलाखतीसारखे नवे प्रयोग, अचूक निरीक्षण आणि साधेपणा ही त्यांची ओळख होती. त्यांच्या जाण्याने मराठवाड्यातील साहित्य आणि पत्रकारिता क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. भावपूर्ण श्रद्धांजली.

# श्री.स.भु. बिडकीनच्या छात्र सैनिकांची कळसुबाई शिखरावर यशस्वी चढाई

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन दि १५ डिसेंबर :** विद्यार्थ्यांमध्ये साहसी वृत्ती निर्माण व्हावी, सामाजिक ऐक्य व सलोख्याची जोपासना व्हावी या उद्देशाने पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील एन.सी.सी. विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील कळसूबाई शिखरावर यशस्वी चढाई केली.

कळसूबाई शिखर हे १६६४ मी. (५४०० फूट) मीटर उंच आहे. कळसूबाई शिखर हे महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर म्हणून ओळखल्या जाते. त्याला महाराष्ट्रातील एव्हरेस्ट संबोधल्या जाते. हे शिखर चढण्यासाठी चार ते पाच तास तर उतरण्यासाठी तीन तास लागतात. अतिशय हिरव्यागार, निसर्ग रम्य सह्याद्री पर्वताच्या रांगा या ठिकाणी बघायला मिळतात. त्यामुळे महाराष्ट्रातील लोकप्रिय ट्रेकिंगचे ठिकाण म्हणून हे परिचित आहे. याठिकाणी साधारणतः उन्हाळ्याच्या मे महिन्यात काजवा महोत्सव आयोजित केला जातो.

अतिशय विहंग दृश्य पाहण्यासाठी पर्यटक, गिर्यारोहक नेहमीच या ठिकाणाला पसंती देतात. या कळसूबाई शिखर गिर्यारोहण मोहिमेत प्रशालेच्या एनसीसी विभागाचे ४६, विद्यार्थी व विद्यार्थिनी, पाच शिक्षक सहभागी झाले होते. याठिकाणी विद्यार्थ्यांनी सामाजिक भान ठेवत स्वच्छता मोहीम सुद्धा राबवली. विद्यार्थ्यांच्या या कृतीचे गिर्यारोहकांनी तोंड भरून कौतुक केले.

या मोहिमेचे नेतृत्व प्रशालेचे एन सी सी अधिकारी बाबासाहेब सोकटकर, आंतरराष्ट्रीय पातळीवरील जागतिक किर्तीचे गिर्यारोहक संस्थेतील क्रीडा शिक्षक किशोर नांवकर, सुरज सुलाने यांनी केले होते.या मोहिमेत विद्यार्थ्यांबरोबर





प्रशालेचे सहशिक्षक ज्ञानेश्वर चाटुपळे, अविनाश खैरे, सुनिती बाविस्कर, पूजा मिसाळ सहभागी झाले होते.

महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर यशस्वीरीत्या चढाई केल्याबद्दल ५० महाराष्ट्र बटालियन एनसीसी छत्रपती संभाजी नगरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल बीपीएस ठाकूर, प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल कीर्ती मुंडले, संस्थेच्या डॉ मिलिंद कोनार्डे, शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला, मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, उपमुख्याध्यापिका मनिषा मिश्रा, शालेय समितीचे सर्व सदस्य, प्रभारी पर्यवेक्षक महेश बहाळकर, राजू शिंदे यांनी सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.



# चित्तशुद्ध आसल्यास वेगळा परमार्थ करण्याची गरज नाही : सुनिल महाराज

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि १५ डिसेंबर :** मनुष्याने कर्म केलेच पाहिजे पण कर्म करतांना चित्त शुद्ध असले पाहिजे, चित्त शुद्ध ठेऊन संसारीक कर्म करतांना हरीनाम घ्यावे वेगळा परमार्थ करण्याची गरजच नाही असे प्रतिपादन ह.भ.प.सुनिल महाराज आष्टीकर यांनी कृष्णापुर ता पैठण येथे हरिनाम सप्ताह दरम्यान श्रीमद् भागवत कथेत केले.

वासना, दंभ, मत्सर आणि अहंकार हे परमार्थातील सर्वात प्रतिबंध आहे ते जाण्यासाठी चित्त शुद्ध ठेऊन भावयुक्त भक्ती केली पाहिजे असे केल्यास नक्कीच भगवंताचे दर्शन होते यात शंकाच नाही असेही सुनिल महाराज आष्टीकर श्रीमद् भागवत कथा निरुपण प्रसंगी म्हणाले, या संगीत कथेदरम्यान सिंथ व गायक अनिल महाराज मुकीर, तबला अक्षय महाराज माने, पॅड वादक चंद्रकांत गायकवाड साथ देत आहेत दर्शनसाठी संतोष महाराज गाडे परिश्रम घेत आहेत.

यावेळी श्रीमद् भागवत कथेचे यजमान माजी सरपंच विष्णु जाधव, अजिंक्य जाधव, मार्गदर्शक संजय महाराज जाधव, आरतीचे यजमान प्रविण चव्हाण, माजी सैनिक बळीराम जाधव, ज्ञानेश्वर औटी, संभाजी जाधव, अण्णासाहेब थिटे, जगन्नाथराव जाधव, बबनराव जाधव, सुरेश जाधव आदींसह मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# महावितरणने फेडले १२,८०० कोटींचे कर्ज

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १५ डिसेंबर :** देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी असलेल्या महावितरणने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतीपूर्वी एकाच हफ्त्यात नुकतीच परतफेड केली. अन्य वित्तीय संस्थेकडून कमी व्याज दराचे कर्ज उभारून तसेच स्वनिधीतून ही परतफेड केली असून त्यामुळे व्याजाच्या रकमेत मोठी बचत होईल, अशी माहिती अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याची सूचना केली असून त्यादृष्टीने कंपनीवरील कर्जाचा बोजा हलका करण्यासाठी यशस्वी पावले टाकण्यात आली.

महावितरणने विविध टप्प्यांवर स्टेट बँकेकडून एकूण १२,८०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यासाठी ८.६५ टक्के ते ९.२५ टक्के दराने व्याज द्यावे लागत होते. त्याऐवजी अन्य वित्तीय संस्थेकडून ७,१०० कोटी रुपये कर्ज ८.२५ टक्के इतक्या कमी व्याजदराने उभारून महावितरणने स्टेट बँकेचे ७,१०० कोटी रुपयांचे कर्ज फेडले. त्या खेरीज महावितरणने स्वनिधीतून ५,६३४ कोटी रुपयांचे स्टेट बँकेचे कर्ज फेडले.

महावितरणने स्टेट बँकेचे कर्ज घेताना आपल्या दहा सर्कलमधील महसूल तारण म्हणून ठेवला होता. या सर्कलमध्ये वार्षिक तीस हजार कोटी रुपयांचा महसूल आहे. स्टेट बँकेचे सर्व कर्ज फेडल्यामुळे हा महसूल तारणमुक्त होईल. त्या आधारे कंपनीला ५०,००० कोटी रुपयांपर्यंतचा निधी माफक व्याजदरात कर्जरुपाने उभा करता येईल.

महावितरणची पत वाढविणारे पाऊल - महावितरणने एकाच हफ्त्यात स्टेट बँकेच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतपूर्व परतफेड करण्यामुळे कंपनीची वित्तीय बाजारातील पत वाढली आहे. ही घडामोड गुंतवणूकदारांचा विश्र्वास वाढविणारी आहे. कंपनीसाठी भविष्यात खासगी किंवा सार्वजनिक बाँड उभारायचे झाल्यास त्यासाठीही इतक्या मोठ्या कर्जाची परतफेड करणे उपयुक्त ठरणारे आहे.

आगामी काळात महावितरणला शेअर बाजारात सूचिबद्ध करण्याच्या दृष्टीनेही ही कर्जाची परतफेड महत्त्वाची आहे.

# माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णालयात फळे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि १५ डिसेंबर :** अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद माजी अध्यक्ष रंगनाथ नाना काळे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव यांच्यावतीने ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथे रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

तसेच कै. बाबुरावजी काळे मेमोरियल स्कूलच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले.त्यानिमित्त संत ज्ञानेश्र्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, समुपदेशक सुनील वानखेडे, सोयगाव राष्ट्रवादी शहर अध्यक्ष रवींद्र काळे, राजू काळे, श्रीराम पाटील, सुभाष चौधरी, दिलीप मचे, दिपक देशमुख, अंकुश



पगारे, कृष्णा पाटील, सूर्यभान गवळी, मंगेश सोहनी, मयूर मनगटे, रवींद्र काटोले, सुधाकर सोनवणे, कमलेश काळे, विवेक महाजन व शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी डॉ.निलेश गावडे, डॉ.सुनील चौधरी व डॉ. पंकज गावित, रमेश कोरडे यांनी परिश्रम घेतले.



# होमगार्ड संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि १५ डिसेंबर :** सोयगाव येथील होमगार्ड पथक कार्यालय सोयगावच्या वतीने आज दि.१४ रविवार रोजी महाराष्ट्र राज्य होमगार्ड संघटनेचा ७९ वा वर्धापन दिनानिमित्त सोयगाव होमगार्ड कार्यालय परिसरात वृक्षरोपण व साफसफाई करण्यात आली.तसेच सोयगाव शहरातील ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. यावेळी सोयगाव होमगार्ड पथाकाचे तालुका समादेशक अधिकारी कडूबा बावस्कर, कृष्णा शेवाळकर, योगेश बोखारे यांनी सोयगाव होमगार्ड पथकातील होमगार्ड जवानांना वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी कडूबा बावस्कर कृष्णा शेवाळकर, योगेश बोखारे, समाधान काळे, ऋषी काळे, राज महंमद शेख, अनंत लवटे, किरण सपकाळ, विलास भवर, दिनेश काळे, इमरान शेख, शांताराम मिसाळ, ज्ञानेश्वर काळे, विजय सोनवणे, संतोष घनगाव, भाग्यवान बनसोडे, घनगाव, संतीश मंडवे, दिनेश काळे, अनंत लवटे, विनोद इंगळे, हिरालाल ठाकरे, गजानन बागुल, श्रावण मंडवे, शिवाजी रोकडे, भिकन रोकडे, रवींद्र सरोदे, सुनिल सोनवणे, गणेश शिनकर, विष्णू घनगाव, महिला होमगार्ड संगीता भालेराव, रुकसाना तडवी, डॉ.अनिकेत घोडके, डॉ. निखात जहा, मंगला हिवर्डे, सुनील वानखेडे, निर्मला जेठे, सुशीला रोकडे, ज्योती चणाल, कैलास पाटील, असलम पठाण, संजय झालवार आदीसह होमगार्ड यांची उपस्थिती होती.





# बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री') आरोग्य आणि स्फूर्तीसाठी एक आयुर्वेदिक टॉनिक

बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री') हे एक विशेषतः तयार केलेले अवलेह (च्यवनप्राश) आहे, जे आजच्या आरोग्य-जागरूक स्त्री-पुरुषांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी बनवले गेले आहे विशेषतः त्यांच्यासाठी जे आपल्या साखरेच्या सेवनावर नियंत्रण ठेवू इच्छितात. हे श्री बैद्यनाथ आयुर्वेद भवन प्रा. लि., यांनी विकसित केले आहे. जी आयुर्वेदिय औषध निर्मितीतील एक अग्रणी संस्था आहे. यात पारंपरिक च्यवनप्राशचे गुण आहेत, पण साखर नाही.

बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री) मध्ये साखर नाही, आणि हे कमी कॅलरी असलेल्या नैसर्गिक मधूर द्रव्यांनी बनवले आहे, ज्यामुळे हे कॅलरीबाबत जागरूक लोकांसाठी उत्तम आहे. या अवलेहमध्ये अनेक मौल्यवान व पारंपरिक औषधी वनस्पतींचा समावेश आहे, ज्यापैकी सर्वात महत्त्वाचा घटकद्रव्य म्हणजे आवळा, जो प्रत्येक चमच्यात व्हिटामिन पुरवतो आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. अश्वगंधा, कौंच बीज, बिल्व, दशमूल आणि केशर हे आरोग्यवर्धक गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहेत. हे शरीरातील अशक्तपणा कमी करण्यात, पोषण देण्यात आणि एकूण स्फूर्ती वाढविण्यात मदत करतात. दालचिनी, जावित्री, गिलोय, विदारीकंद या वनस्पती शरीराला विविध प्रकारच्या संसर्गापासून संरक्षण देण्यास मदत करतात.

रक्तातील साखरेच्या उच्च पातळीमुळे बहुतेक सगळ्या व्यक्तिंना अशक्तपणा आणि कमी रोगप्रतिकारक शक्तीचा त्रास होतो. अशा वेळी नियमितपणे बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री) चे सेवन, संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैलीसोबत केल्यास शरीरात ऊर्जा, शक्ती आणि सर्वांगीण आरोग्य सुधारण्यास मदत होते. च्यवनफिट (शुगर फ्री') मध्ये असलेले अँटिऑक्सिडंटने समृद्ध वनस्पती, रोगप्रतिकारक शक्ती संतुलित ठेवण्यात मदत करतात. श्री बैद्यनाथ आयुर्वेद भवन नेहमीच प्रामाणिक आयुर्वेदिक संशोधन आणि नवीन औषधनिर्मिती द्वारे मानवी आरोग्य संवर्धनासाठी समर्पित आहे. बैद्यनाथ संशोधन केंद्राच्या सखोल अभ्यासानंतर, बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री) हा योग तयार करण्यात आला, हा अशा लोकांच्या गरजांनुसार निर्मित आहे जे पारंपरिक अवलेहचे फायदे साखरमुक्त स्वरूपात अनुभवू इच्छितात.

**वापरण्याची पद्धत :** दररोज दोन वेळा १ ते २ चमचे (५-१० ग्रॅम) दूधासोबत किंवा वैद्याच्या सल्ल्यानुसार घ्यावे. बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री') हे नैसर्गिक, सुरक्षित आहे, सर्व ऋतुंमध्ये उपयुक्त आहे आणि सर्व केमिस्ट तसेच आयुर्वेदिक दुकानांमध्ये उपलब्ध आहे. (शुगर फ्री') - अतिरिक्त साखर नाही)

**- वैद्य. प्रतिन पटलवार**
**प्रधान वैद्य**

Customer Care No.:
8448444935

## अग्रलेख...

# नेमेचि निलंबन, पण शून्य निष्पन्न

नागपुरात दरवर्षी होणाऱ्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात बाकी काही घडो अथवा न घडो, दोन-चार शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या निलंबनाची घोषणा मात्र ठरलेली. दोघा-चौघांचे निलंबन ठरलेले. सभागृहात एखाद्या विषयावर तावातावात चर्चा होते. अमक्या अधिकाऱ्याला निलंबित करा, तमक्याची बदली करा, याच्यावर कारवाई करा, त्याला दंडित करा, अशा मागण्या आमदारांकडून केल्या जातात. मंत्री उत्तर देताना निलंबनाची घोषणा करतात. जात पडताळणी ते अवैध वाळू उपसा इथपर्यंतच्या प्रकरणात अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना निलंबित केले जात असल्याची घोषणा सरकार करते. विषय संपतो. परंतु, निलंबित केलेल्या अधिकाऱ्याची खरोखर आणि व्यवस्थित चौकशी झाली काय, त्याने नेमके काय केले होते, त्याला पुन्हा सरकारी सेवेत घेतले गेले काय, याची माहिती पुढच्या अधिवेशनातही मिळत नाही. संबंधितांना निलंबित केल्याचे समाधान त्या विषयाची कळकळ असलेल्यांना मिळू शकते. सरकारलाही कर्तव्यपूर्तीचा आनंद मिळू शकतो. त्या पलीकडे या निलंबनातून फारसे हाती लागत नाही. वास्तवात निलंबन ही शिक्षा किंवा दंड नाही. ती फक्त तात्पुरती प्रशासकीय कारवाई असते. बहुतेक प्रकरणांत कोणतीच कारवाई होत नाही, असे जाणकार सांगतात. याचा अर्थ असा की, अधिवेशनाच्या काळातील निलंबनाच्या बहुतांशी घोषणा हा निव्वळ सोपस्कार असतो. ते तात्पुरते समाधान असते किंवा तणाव संपवण्यासाठीचा मार्ग म्हणून या कारवाईचा वापर होतो. निलंबनाचा मुख्य उद्देश संबंधित व्यक्तीचा त्या विषयाच्या चौकशीतील हस्तक्षेप टाळणे आणि गंभीर गैरव्यवहार झाल्यास पुढील तपास सुलभ करणे हा असतो. निलंबन हे कधीही अंतिम शिक्षा म्हणून गणले जात नाही. विभागीय किंवा तत्सम चौकशीनंतर शिक्षेचा किंवा दंडाचा निर्णय घेतला जातो. निलंबन काळात कर्मचाऱ्याचे पद कायम राहते आणि त्याला अर्धा पगारही मिळतो. सर्वसाधारण प्रक्रिया अशी आहे की, निलंबित अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची निश्चित मुदतीत चौकशी व्हावी आणि त्यावरून शिक्षा निर्धारित केली जावी. समर्थनीय कारणास्तव चौकशीला मुदतवाढ मिळू शकते. परंतु, बहुतांशी प्रकरणांत मूळ आरोपातच दम नसल्याने किंवा निलंबनाच्या घोषणेनंतर चौकशी व्यवस्थित न झाल्याने सहा-आठ महिन्यांत निलंबनाचे कवित्व संपते. तो अधिकारी किंवा कर्मचारी मूळ पदावर, फारच फार तर बदलीच्या जागी रुजू होतो आणि सरकारी व्यवस्थेचे रहाटगाडगे जुन्याच पद्धतीने पुन्हा सुरू होते. वर्षानुवर्षे हे असेच चालत आले आहे. काही वेळा फार तर बढती किंवा वेतनवाढ रोखणे असे घडतेही. पण ते अपवादात्मक. एरवी सरकारी कर्मचाऱ्यांकडून सरकारी कर्मचाऱ्याला सांभाळून घेण्याची रीतच आहे. मग तो सनदी अधिकारी असो वा साधा कारकून. शासन असो वा प्रशासन, यांच्यात ही एकमेकांना सांभाळून घेण्याची ही जी रीत आहे, तेच आपल्या व्यवस्थेच्या प्रभावशून्यतेचे कारण आहे.

आतापर्यंतचा अनुभव असा दिसतो की, निलंबन ही प्रशासकीय कारवाई असली तरी त्यातून प्रशासनात कोणत्याही प्रकारचा दर्जात्मक बदल घडलेला नाही. अधिवेशनाच्या काळात सरकारवर जनतेचा, माध्यमांचा आणि विरोधकांचा दबाव असतो. एखादा विषय तापलेला असतो. तत्काळ कारवाईची मागणी होते. अशा वेळी निलंबन हा सरकारसाठी सर्वांत सोपा, स्वस्त आणि सुरक्षित पर्याय असतो. एखाद्याचा दोष सिद्ध न करता 'कठोर पाऊल उचलल्याचा' आभास सरकारला निर्माण करता येतो. यात ना न्यायालयाचा धोका, ना प्रशासकीय यंत्रणेशी थेट टक्कर. मंत्री महोदयांच्या एका घोषणेत विषय संपुष्टात येतो. ''संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत,'' अशी घोषणा झाल्याबरोबर टाळ्या पडतात. विरोधक शांत होतात, माध्यमांना मथळा मिळतो आणि प्रशासन मोकळा श्वास घेते. वास्तवात हे सगळे केवळ अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या नैतिक अध:पतनामुळे घडते का?...की या अवस्थेसाठी अन्य कारणेही आहेत? अवैध वाळू उपसा, बोगस जात प्रमाणपत्रे, बनावट दिव्यांग दाखले, भ्रष्ट भरती प्रक्रिया, जमिनीचे फेरफार, अनधिकृत बांधकामे ही सगळी प्रकरणे अचानक उद्भवलेली नसतात. ती वर्षानुवर्षे चालू असतात. सामान्य माणसांचे हाल सुरूच असतात. संबंधित अधिकारी बदलत असतात, पण पद्धत बदलत नाही. कारण यातील दोष हा वैयक्तिक नसून संरचनात्मक स्वरूपाचा आहे. व्यवस्थाच तशी झालेली आहे. आज निलंबित झालेला अधिकारी कालपर्यंत ''काम करणारा'', ''फायली वेळेवर काढणारा'', ''व्यवहारकुशल'' म्हणून ओळखला जात असतो. उद्या तो पुन्हा सेवेत येतो आणि पुन्हा तीच व्यवस्था पुढे चालवतो. एक काळ असा होता की, जास्तीत जास्त वेळा ज्याला निलंबनाच्या कारवायांना सामोरे जावे लागले असेल, तोच कर्मचाऱ्यांच्या संघटनेचा नेता होण्यास पात्र ठरायचा. असे कर्मचारी इतरांचे रोल मॉडेल्स ठरायचे. कारण निलंबनाच्या कारवाईतून अंतिम निष्पन्न बहुतेकदा शून्यच येते, याचा अनुभव प्रशासनातील किंवा नोकरशाहीतील मंडळींनी वर्षानुवर्षे घेतलेला आहे. निलंबनानंतरची आरोपांची चौकशी ही संपूर्ण प्रक्रियेतील सर्वांत दुबळी बाब असते. त्यात पुरेसे गांभीर्य नसते आणि हेतू स्वच्छ असेल असेही नाही. चौकशी अधिकारी बहुतेकदा त्याच विभागातील असतात. अनेकदा त्याच कॅडरमधील किंवा भविष्यात ज्यांच्यासोबत काम करायचे आहे असे असतात. ''आज मी तुझी चौकशी करतो, उद्या तू माझी करशील कदाचित,'' असा सारा प्रकार असतो. त्यामुळेच मग एकमेकांना सांभाळून घेण्याचा कार्यक्रम सुरू असतो. अखेरीस, अपेक्षेप्रमाणे, असा निष्कर्ष निघतो की ''आरोप पूर्णपणे सिद्ध होत नाहीत'' किंवा ''तांत्रिक कारणांमुळे कारवाई शक्य नाही.'' हा निर्णय कुणासाठीही धक्कादायक नसतो. तो साऱ्यांसाठी अपेक्षित असतो. साऱ्यांनीच अशा निलंबन कारवायांचे फलित गृहीत धरलेले असते. त्यामुळे व्यक्ती निलंबित झाली तरी व्यवस्थेत फारसा बदल होत नाही. यातले वास्तव एकदा तरी तपासले गेले पाहिजे. त्यासाठी गेल्या दशकभरातील अधिवेशनांमध्ये झालेल्या निलंबनांचे आकडे काढून पाहा. किती अधिकाऱ्यांना निलंबित केले गेले, किती जणांची चौकशी पूर्ण झाली, किती जण दोषी ठरले, किती जणांना शिक्षा झाली आणि किती जण पुन्हा सेवेत आले, याची माहिती संकलित केली तर धक्के बसतील. प्रशासन सुधारण्यासाठी दोन गोष्टी अत्यंत आवश्यक असतात. त्यातील पहिली असते संबंधित कर्मचारी किंवा अधिकाऱ्याची निश्चित जबाबदारी आणि ती न निभावल्यास केल्या जाणाऱ्या शिक्षेची भीती. आपल्या व्यवस्थेत सध्या दोन्हींचा अभाव आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांना हे चांगलेच कळते की, काहीही झाले तरी फार-फार तर निलंबन होईल. बदली होईल. काही काळ शांत बसावे लागेल. पण नोकरी जाणार नाही. पेन्शन धोक्यात येणार नाही. समाजात मानहानी होईल, पण ती तात्पुरती असेल. शिक्षेची भीतीच नसते, तेव्हा नियम पाळण्याची प्रेरणाच संपुष्टात येत असते. आपल्या प्रशासकीय व्यवस्थेचे तसेच झाले आहे. त्यामुळे अशी कितीही निलंबने झाली तरी व्यवस्था बदलण्याची शक्यता नाही. आपण साऱ्यांनी हे समजून घ्यायला हवे की, निलंबन हा आपल्या प्रशासकीय व्यवस्थेत निर्माण झालेल्या दोषांवरील उपचार नाही. ते फक्त तात्पुरते वेदनाशामक आहे. तो तात्पुरता दिलासा आहे. प्रश्न निलंबन किती जणांचे झाले याचा नाहीच. किती जणांवर खरोखर कारवाई झाली, त्यातून किती जण सुधारले आणि किती विषय खरोखर निकाली निघाले हा खरा प्रश्न आहे. आज आपण देश प्रगतिपथावर आहे, असे उच्चरवात म्हणतो. जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताचे नाव समाविष्ट झाले आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशात सर्वाधिक वेगाने वाढत असल्याचेही सांगितले जाते. मात्र, या प्रगतीच्या उंचावत असलेल्या आलेखाला पाठबळ देण्याची जबाबदारी असलेली लोकनियुक्त मंडळी आणि प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी यांच्यात उत्तरदायित्वाच्या संस्कृतीचा अभाव आहे. निलंबनात समाधान मानण्याऐवजी उत्तरदायित्वाची संस्कृती रुजवण्यावर अधिक भर दिला तर राज्याचे, लोकांचे, शासन-प्रशासनाचे आणि देशाचेही भलेच होईल.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी


# रुपयाची वाटचाल शंभरीकडे!

१९४७ मध्ये एका डॉलरसाठी ३ रुपये ३० पैसे मोजावे लागत असत. आता त्याच डॉलरसाठी ९० रुपये मोजावे लागत असून , २०२७ पर्यंत एका डॉलरसाठी १०० रुपये मोजावे लागतील अशी चिन्हे आहेत. मात्र याला अर्थव्यवस्थेची कमजोरी मानता येणार नाही. डॉलरच्या तुलनेत रुपया घसरण्याचे फायदे आणि तोटे असे दोन्ही पैलू आहेत.

**१५ वर्षे स्थिर** : १९५० ते १९६५ अशी पंधरा वर्षे डॉलर- रुपया यांचा विनिमय दर स्थिर होता. एका डॉलरसाठी ४ रुपये ७६ पैसे मोजावे लागत होते. १५ वर्षांत या विनिमयदरात काडीचाही म्हणजे एका पैशाचाही बदल झाला नाही. त्यानंतर दोन वर्ष रुपयाची किंमत घसरून एका डॉलरसाठी ७.५० रुपये मोजावे जाऊ लागले. नंतर रुपया पुन्हा ४.७६ या विनिमय दरावर स्थिर झाला. १९८२ पर्यंत डॉलरसाठी रुपयाची किंमत एकेरी आकड्यात होती. म्हणजे एका डॉलरसाठी कधी ८ तर कधी ९ रुपये मोजावे लागत होते.

**१९९१ नंतर...** : रुपयाची दुर्गती की अधोगती सुरू झाली ती १९९१ नंतर. त्यावेळी देशात चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सरकार होते. आर्थिक स्थिती अतिशय गंभीर होती. प्रथमच देशाला आपले सोने गहाण ठेवावे लागले होते. देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर होता. त्या वर्षात एका डॉलरसाठी २२ रुपये ७४ पैसे मोजावे लागत होते. देशाची सूत्रे हाती घेतल्यानंतर पी. व्ही. नरसिंहराव यांनी देशाची अर्थव्यवस्था सांभाळली. मात्र त्यांच्याच कार्यकाळात रुपया - डॉलर दर ३५ रुपयांवर जाऊन पोहोचला. आणि १९९८ मध्ये वाजपेयींचे सरकार येईपर्यंत तो ४१ रुपयांवर जाऊन पोहोचला होता. २००४ मध्ये वाजपेयींचे सरकार गेले तेव्हा एका डॉलरसाठी ४५ रुपये मोजावे लागत होते. म्हणजे स्वातंत्र्यानंतर पहिल्या ४७ वर्षांत रुपयाचा दर ४२ रुपयांनी वाढला. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास डॉलरच्या तुलनेत एका वर्षात एका रुपयापेक्षाही कमी वाढ होत होती आणि नंतरच्या २० वर्षांत रुपया नव्वदीच्या घरात पोहोचला. डॉलरच्या तुलनेत ही वाढ दरवर्षी सरासरी दोन रुपये आहे. मागील दोन वर्षात डॉलरच्या तुलनेत रुपया १० रुपयांनी घसरला आणि हाच दर कायम राहिल्यास दोन वर्षांत एका डॉलरसाठी १०० रुपये मोजावे लागतील.

**तेल महाग, निर्यात स्वस्त** : रुपया घसरल्याचा मोठा फटका कच्च्या तेलाच्या आयातीला बसत असतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाची किंमत डॉलरने ठरत असते. रुपया घसरल्याने या आयातीसाठी जास्त किंमत मोजावी लागते . मात्र याचा दुसरा फायदा निर्यातकांना होतो. निर्यात स्वस्त होते. याचा फायदा निर्यातक उठवू शकतात. याचा परिणाम आयात-निर्यात यांच्यातील तूट कमी होण्यात होते. रुपया घसरण्याचे हे काही फायदे असले तरी सर्वसाधारणपणे घसरता रुपया हे अर्थव्यवस्थेसाठी सुचिन्ह



मानले जात नाही. पण, याचा अर्थ अर्थव्यवस्था कमजोर होत आहे वा झाली आहे असाही नाही. विशेषत: आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यासाठी घसरता रुपया फायद्याचा विषय ठरू शकतो. त्याचप्रमाणे औषधी तयार करणाऱ्या कंपन्यांनाही याचा फायदा होणार असून, त्यांची निर्यात वाढेल व परिणामी नफाही वाढेल. ऑटो क्षेत्रातील कंपन्यानांही रुपया घसरणे फायदेशीर राहात आलेले आहे.

**डॉलर मजबूत?** : रुपया कमजोर झालेला नाही तर डॉलर मजबूत झाला आहे असा एक युक्तिवाद केला जात आहे. डॉलर मजबूत झाल्याने स्वाभाविकच रुपया कमजोर होत आहे. याचा भारताच्या अर्थव्यवस्थेची काहीही संबंध नाही असाही एक तर्क दिला जात आहे.

**ट्रम्प काय करणार?** : जागतिक अर्थकारणात अमेरिकेचा दबदबा मोडावयाचा असेल तर डॉलरला कमजोर केले पाहिजे या व्यूहरचनेतून रशिया-चीन नवे चलन निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे मानले जाते. हीच बाब अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प वारंवार म्हणत आहेत. त्यांचा रोख ब्रिक्स देशांकडे आहे. या संघटनेत भारतही आहे. ट्रम्प यांनी भारतावर नाराज होण्याचे हेही एक कारण असल्याचे म्हटले जाते. भारत आता रशिया-चीन गोटात सामील झाला असल्याचे त्यांचे आकलन आहे. मागील काही महिन्यांपासून ट्रम्प यांनी भारताच्या विरोधात जे आर्थिक निर्णय घेतले आहेत त्याचा स्वाभाविक परिणाम डॉलरच्या तुलनेत रुपया घसरण्यावर होत आहे. डॉलर कमजोर करण्याचा प्रयत्न काही देश करीत असले तरी ते प्रयत्न यशस्वी होणार नाहीत असे ट्रम्प सांगत आहेत. त्यांचा सारा रोख चीनकडे आहे.

**चीनचा धसका** : जागतिक राजकारणात व अर्थकारणात चीनचा दबादबा वाढू लागला आहे. याचा फटका डॉलरलाही बसू शकतो याची जाणीव असल्याने ट्रम्प अशी विधाने करीत आहेत. मात्र अमेरिका-चीन वादात भारताचा रुपया विनाकारण भरडला जात आहे. येणाऱ्या काळात ट्रम्प डॉलरला मजबूत करण्यासाठी आणखी काही निर्णय घेण्याची शक्यता असल्याचे मानले जाते. ते भारताच्या विरोधातही काही निर्णय घेऊ शकतात. म्हणजे याचा दबाव रुपयावर येत तो आणखी कमजोर होऊ शकतो.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांच्यासाठी नव्या वर्षात रुपया सावरण्याचे एक मोठे आव्हन राहणार आहे. यासाठी त्या कोणते निर्णय घेतात याची कल्पना १ फेब्रुवारी रोजी मांडल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पात मिळण्याची शक्यता आहे.

**इंडिगोच जबाबदार** : कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त नफा कमावण्याचा प्रयत्न विमान कंपन्या करतात आणि याचे दुष्परिणाम आतापर्यंतच्या बहुतेक विमान कंपन्यांना भोगावे लागले असले तरी इंडिगोने त्यापासून धडा घेतला नाही असे दिसते. त्याचाच परिणाम म्हणजे आता या कंपनीला मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. हवाई क्षेत्र खाजगी कंपन्यांसाठी सुरू झाल्यानंतर डेक्कन एअर, गो एअर, जेट एअर लाईन्स, किंगफिशर यासारख्या कंपन्या आल्या आणि गेल्या. इंडिगो याला अपवाद मानली जात होती. वक्तशीरपणा, नवी विमाने या शिदोरीवर इंडिगोने हवाईक्षेत्रात आपले नाव व दबदबा स्थापित केला आणि अचानक इंडिगोचे विमान वादळात सापडले. केंद्र सरकारने जारी केलेल्या दिशानिर्देशांचे पालन या कंपनीने केले नाही. कमीतकमी कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त काम करवून घेण्याचा प्रयत्न इंडिगो करीत होती. मात्र, सरकारी नियमांचे पालन करण्याची वेळ येताच इंडिगोचे सारे वेळापत्रक कोसळले आणि याचा फटका लाखो विमान प्रवाशांना बसला. येत्या काही दिवसांत इंडिगोची विमानसेवा पूर्ववत् होईल असा दावा कंपनीकडून केला जात आहे. केंद्र सरकारने या कंपनीच्या उड्डाणांची संख्या १० टक्क्यांनी कमी केली आहे. याचा फटका कंपनीला बसणार आहे. आजवर फायद्यात चालणाऱ्या कंपनीला प्रथमच तोटा झाल्याचे सांगितले जाते.

**मोठे संकट** : सध्याचा स्थितीचा आर्थिक फटका या कंपनीला बसणार आहे. याशिवाय उड्डाणांची संख्या १० टक्क्यांनी कमी झाल्याने त्याचाही परिणाम कंपनीच्या उत्पनावर होईल असे मानले जाते. त्यामुळे येणाऱ्या काही दिवसात इंडिगोच्या विमानसेवा सुरळीत सुरू होणार असल्या तरी सध्याच्या संकटाने इंडिगोच्या अस्तित्वावर जे प्रश्नचिन्ह उभे केले आहे ते सहजासहजी जाणारे नाही. येणारे काही महिने 'इंडिगो'साठी वादळी हवामानासारखे ठरणार आहेत. यातून इंडिगो व्यवस्थापन आपल्या कंपनीस कसे बाहेर काढते यासाठी मोठे कौशल्य लागणार आहे.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# महाराष्ट्र बनले वन्यप्राण्यांचे नंदनवन?

२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि सुधीर मुनगंटीवार वनमंत्री झाले. तेव्हापासून वन्यजीवांच्या संवर्धनासाठी ठोस प्रयत्न सुरू आहे. या १२ वर्षांच्या काळात वाघांची संख्या जवळपास दुप्पट झाली आहे. जगातील सर्वांत रुबाबदार व आकाराने सर्वांत मोठा असलेला जय नावाचा वाघ अचानक गायब झाला. ही एक हानी सोडली तर वाघांचे संवर्धन बऱ्यापैकी झाले आहे. आज महाराष्ट्रात वाघांची एकूण संख्या ४४४ असल्याचे सांगितले जाते. पण, ही आकडेवारी २०२२ च्या वन्यप्राणी गणनेतील आहे. संपूर्ण भारताचा विचार केला तर आज देशात ३ हजार ६८२ वाघ आढळतात. दहा वर्षांपूर्वी ही संख्या अवघी १ हजार ७०६ होती. व्याघ्र संवर्धनात महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. वाघांचे संवर्धन झाले. परंतु, याच कुळातील बिबट्यांनी मात्र महाराष्ट्रातील नागरिकांच्या मनात दहशत निर्माण केली आहे.

पूर्वी लांडगे गावात शिरून शेळ्या मारायचे. आता लांडगा दुर्मिळ झाला आहे. तरस हा प्राणी तर ताडोबाशिवाय इतर ठिकाणी दिसतही नाही. बिबट्यांची संख्या मात्र झपाट्याने वाढत आहे. महाराष्ट्रात आज ३ हजार ८०० पेक्षाही अधिक बिबटे असल्याचे सांगितले जाते. परंतु, ही आकडेवारी अंतिम असू शकत नाही. बिबट तसा दबा धरून शिकार करणारा प्राणी पण आता तो गावात शिरून कधी खुराड्यातून कोंबड्या पळवितो तर कधी शेतकऱ्यांच्या शेळ्या मारतो. बिबटे नागरिकांवरही हल्ले करीत असल्याने एका गंभीर समस्येला सध्या महाराष्ट्राला सामोरे जावे लागत आहे. बिबट्यांची दहशत सध्या पुण्यापासून नागपूरपर्यंत आहे. नागपूर शहराच्या पारडी भागात काही दिवसांपूर्वी एका बिबट्याने हल्ला करून ८ नागरिकांना गंभीर जखमी केले. पारडी भागात बिबट्याने पंधरा दिवसांत केलेला हा दुसरा हल्ला होता. नोव्हेंबर-डिसेंबरदरम्यान बिबट्यांच्या हल्ल्यात १४ शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. जुन्नर तालुक्यात दीड महिन्यात बिबट्यांनी ३ जणांचा बळी घेतल्यानंतर वनविभागाने ६८ बिबटे पकडले. त्यानंतर पुन्हा संगमनेर भागात बिबट्याने ६ वर्षांच्या मुलाचा बळी घेतल्याने खळबळ उडाली. चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली आदी जिल्ह्यांत दरवर्षी वाघांच्या हल्ल्यात मोठ्या प्रमाणात नागरिकांचा जीव जातो. आता बिबट्यांनीही हल्ले सुरू केल्याने नागरिक हतबल झाले आहेत. वर्धेसारख्या मध्यवर्ती जिल्ह्यातही वाघांसह बिबट्यांची दहशत आहे. बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे निर्माण झालेल्या संकटावर विधिमंडळातही बरीच खलबते झाली. शासनाने २००१ पासून नोव्हेंबर २०२५ पर्यंत बिबट्यांच्या हल्ल्यात ५५ नागरिकांचा मृत्यू तर १५० जण गंभीर जखमी झाल्याची माहिती दिली. याच काळात बिबट्यांनी तब्बल २७ हजार ९५२ पाळीव जनावरांचाही जीव घेतल्याचे सांगण्यात आले. वन मंत्रालयाने या समस्येवर तोडगा काढण्यासाठी जंगलात १ कोटीच्या शेळ्या सोडण्याचा प्रस्तावसुद्धा ठेवला. परंतु, हा निर्णय या समस्येवरील कायमस्वरूपी तोडगा ठरू शकत नाही. कारण, शेळ्या जंगलात सोडल्या तरी त्या घरी परत येऊ शकतात. शिवाय असहाय शेळ्यांवर अन्य हिंस्र प्राणी आपला दावा सांगू शकतात आणि यावरून जंगलातील प्राण्यांमध्ये संघर्ष उद्भवू शकतो. अमरावतीचे आमदार रवी राणा यांनी तर बिबट्याला पाळीव प्राण्याचा दर्जा देण्याची मागणी केली. बिबटे खूप उग्र स्वभावाचे असतात. त्यामुळे त्यांना घरी पाळता येणे शक्य वाटत नाही. केंद्र सरकारने प्रायोगिक तत्त्वावर बिबट्यांची नसबंदी करण्यास परवानगी दिली आहे. हा या समस्येवरील एक प्रमुख उपाय ठरू शकतो. वन आणि वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करण्यात शासन-प्रशासन यशस्वी झाले. परंतु, आता याच वन्यजीवांमुळे नागरिकांचा जीव धोक्यात आल्याने वनविभागाची डोकेदुखी वाढली आहे. शासन या समस्येवर नेमका कुठला तोडगा काढते, हे आगामी काळात दिसून येईलच.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# रामनामाचा प्रसार करणारे संत

गोंदवलेकर महाराज हे रामनामाचा प्रसार करणारे संत होते. रामनामाचा सर्व लहान-थोरांमध्ये प्रसार करणारे, प्रत्येकाला भक्तिमार्गाला लावणारे संत गोंदवलेकर महाराज यांची पुण्यतिथी नुकतीच झाली. गोंदवलेकर महाराज यांचा अवतार म्हणजे नामावतारच होता. साताऱ्याजवळील गोंदवले या गावी राहत असताना त्यांच्याकडे जर एखादा मोठा शास्त्री पंडित आला, तर ते त्याला गावातील हनुमानाच्या मंदिरात रामनामाचा जप करण्यासाठी दिवसभर बसवत असत. परंतु एखादा मजूर त्यांच्याकडे आला, तर ते त्याला आपल्या सोबत शेतावर काम करायला नेत आणि उर्वरित वेळेमध्ये त्याला श्रीराम जय राम जय जय राम हा मंत्र देऊन त्याचा जप करायला सांगत असत.

महाराज म्हणजे मूर्तिमंत नम्रता, प्रेम, वात्सल्य यांची मूर्ती होते. भक्तांचे दु:ख, रोग, कष्ट हे ते आपल्या अंगावर घेत असत. एकदा एक मनुष्य महाराजांकडे आला व त्यांना म्हणाला, ''माझा मुलगा खूप आजारी आहे. तुम्ही याला बरे करा. मी खूप दुरून तुमची कीर्ती ऐकून आलो आहे.'' महाराज त्याला म्हणाले, ''अरेरे, इतक्या दुरून तुम्ही आलात! तुमचे हे कष्ट वाया जात आहेत हे पाहून मला अतिशय दु:ख होत आहे.'' त्यावर तो मनुष्य म्हणाला, ''महाराज, असे बोलू नका. काहीही करा, पण माझ्या मुलाला बरे करा.'' अशी वारंवार विनवणी केल्यानंतर शेवटी महाराज म्हणाले, ''मी तर काही मोठा साधू नाही. माझा तर काही मोठा अधिकार सुद्धा नाही. परंतु मी रामरायाला तुमच्या मुलासाठी साकडे घालीन आणि त्याला आळवीन की यांच्या मुलाला बरे कर.'' यानंतर तो मुलगा बरा झाला. महाराजांनी जे काही केलं, ते सर्व रामरायाला समर्पित केलं.

महाराज इंदूरमध्ये असताना एक किसनराव नावाचा मोठा सरकारी अधिकारी, जो सर्व अवगुणसंपन्न होता, त्याच्या कानावर महाराजांची कीर्ती गेली आणि तो महाराजांना भेटायला आला. महाराजांना पाहून तो म्हणाला, ''तुम्ही जे ढोंग माजविले आहे, ते इतर ठिकाणी खपले असेल, पण इथे तुमची माझ्याशी गाठ आहे. इथे तुमचे काही चालणार नाही.'' त्यावेळेस महाराज म्हणाले, ''तुमचे म्हणणे खरे आहे, पण येथे कोणाचे चालणार नाही, एवढेच आपण बघूया.'' महाराजांच्या या उत्तरावर तो अतिशय संतप्त झाला. तोंडाला येईल ते महाराजांना बोलू लागला. परंतु महाराज अतिशय शांत, प्रसन्न होते. ते पाहून तो जरा चपापला व म्हणाला, ''तुम्ही स्वतःला साधू म्हणता, मग माझे भविष्य सांगून दाखवा. जर तुम्ही बरोबर सांगितले, तर मी तुम्हाला खरा साधू समजेल.''त्यावर महाराज म्हणाले, ''आम्ही तर बोलून चालून एक साधे रामदासी आहोत. एका रामाचे नावच आम्हाला तेवढे माहीत आहे. बाकीचे इतर काही ज्ञान आम्हाला नाही.'' त्यावेळेस महाराजांच्या जवळ गोदू नावाची एक दहा वर्षांची मुलगी उभी होती. महाराजांनी तिच्या पाठीवर थाप मारली व म्हणाले, ''गोदू या रावसाहेबांना त्यांचे भविष्य सांग.'' गोदू चटकन पद्मासनावर बसली, डोळे मिटून रावसाहेबांना म्हणाली, ''आजपासून आठव्या दिवशी तुझी दोन पोरे मरतील. पंधरा दिवसांनी तुझी बायको मरेल आणि त्यानंतर तुझ्यावर सरकारी रोष होईल. पण महाराजांना जर तू शरण आला, तर त्यातून तू मोकळा होशील.'' हे ऐकल्यावर सर्व लोक चकित झाले. हा अधिकारी मनात चरकला, पण वरवर हसत निघून गेला. पुढे ईश्वर इच्छेने त्याची दोन्ही मुले आटलेल्या ओढ्यात खेळत असताना अचानक पाणी आले व ती बुडून मरण पावली. त्यांच्या दु:खाने त्याची बायको वेडी झाली व तिने विहिरीत जीव दिला. याने आतापर्यंत जे पैसे खाल्ले होते, ते उघड झाले व सरकारने त्याला बडतर्फ केले. इतके सगळे झाल्यावर तो महाराजांकडे आला व म्हणाला, ''माझ्या अपराधासाठी आपण मला एवढी मोठी शिक्षा कशी काय केली?'' अत्यंत कळवळून महाराज म्हणाले, ''अरे, हे तू काय बोलतोस? मी शिक्षा करीन ही कल्पनाही मला सहन होत नाही. आतापर्यंतच्या गोष्टी तुझ्या प्रारब्धाने घडलेल्या आहेत. माणसाचे जन्म-मृत्यू हे भगवंताच्या हाती असतात.'' महाराजांनी त्याला रामनामाचा मंत्र दिला. त्यानंतर पश्चात्तापाने दग्ध झालेला तो अधिकारी उठता-बसता रामनाम घेऊ लागला. पुढे त्याच्यावरचे आरोप नष्ट झाले, तक्रार काढून घेतली गेली. त्याला वरची जागाही मिळाली, परंतु आता त्यात आमूलाग्र बदल झालेला होता. जो आधी साधा किसनराव होता, त्याला आता लोक भगत किसनराव म्हणू लागले.

महाराजांची कीर्ती खूप मोठी झाली होती. एका शास्त्रीबुवाला ती पसंत पडली नाही. त्यांनी रामनाम घेणाऱ्या लोकांना म्हटले, ''तुम्ही एका रामदास्याच्या नादी लागून अज्ञान्यासारखे राम-राम म्हणत बसता.'' लोक म्हणाले, ''तुम्हाला जे बोलायचे असेल ते महाराजांशी बोला. आम्हाला काही जास्त माहीत नाही.'' एकदा महाराज रामाच्या दर्शनासाठी राममंदिरात आले असताना शास्त्रीबुवा तिथे आले. त्यांना पाहिल्यावर महाराजांनीच त्यांना नमस्कार केला व जवळ बसवले. शास्त्रीबुवा म्हणाले, ''तुम्ही हे काय लोकांना रामनाम घ्यायला सांगत आहात? तुम्हाला वेदशास्त्र काही माहीत नाही. उगीच राम राम म्हणत बसता आणि इतरांना तसे करायला लावता. तुम्ही निश्चितच नरकाचे धनी व्हाल.''त्यावर महाराज म्हणाले, ''शास्त्रीबुवा, क्षमा करा. मी तर फार अज्ञानी आहे. माझ्यावर आपण संताप करू नये. पण नाम हे भगवंताला फार प्रिय आहे. त्याचा प्रताप आपल्याला लवकरच कळेल. आपणही नाम घेऊ लागाल.'' शास्त्रीबुवा म्हणाले, ''मला वेड लागले तरच मी नाम घेईन. नाहीतर ही जीभ नामाचा उच्चार करणार नाही.'' हे ऐकून महाराज म्हणाले, ''भगवंताची इच्छा तशीच असली तर तेही होईल.'' शास्त्रीबुवा महाराजांना बरेच बोलले व मुक्कामी गेले. त्याच रात्री पहाटे शास्त्रीबुवा एकदम उठले. त्यांनी हातात दोन जळकी लाकडे घेतली, त्यांची टिपरी करून मोठमोठ्याने रामनाम करीत गावभर हिंडले. त्यांना अंगावरच्या कपड्यांची शुद्ध राहिलेली नव्हती. ही वार्ता महाराजांच्या कानावर आल्यावर त्यांनी शास्त्रीबुवांना आणण्यासाठी मनुष्य पाठवला. महाराजांनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवला, तेव्हा त्यांना गाढ झोप लागली व ते बरे झाले. परंतु त्यांच्या वृत्तीमध्ये एकदम फरक पडला व ते रामनाम घ्यायला लागले.

महाराज नेहमी गृहस्थांना सांगत, ''गृहस्थांनी कुठलेही दान करणे शक्य झाले नाही तरी अन्नदान मात्र जरूर करावे.'' त्यांच्या जीवनात त्यांनी अनेक वेळा मोठमोठे अन्नदान केले. आपल्या दैनंदिन जीवनात आपण बरेच वेळा बिनकामाच्या विषयांवर बोलत असतो. हा सर्व वेळ आपण रामाचे नाव घेण्यात घालवला पाहिजे. पूजनीय गोंदवलेकर महाराजांचे जीवन हे रामनामाला समर्पित जीवन होते. त्यांच्यामुळे सर्वसामान्य माणसाला रामनामाची दीक्षा मिळाली. रामनामाचा मोक्षाकडे जाणारा मार्ग सापडला. रामनामाच्या जपामुळे संपूर्ण समाजात सात्त्विक वातावरण निर्माण करण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न आपण रामनाम घेऊन करू शकतो.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-७३

सोमवार, १५ डिसेंबर २०२५

### संस्कृति सबकी एक चिरंतन खून रगों में...

विराट सागर समाज अपना हम सब इसके बिंदू हैं
राम कृष्ण गौतम की धरती, महावीर का ज्ञान यहां
वाणी खंडन मंडन करती, शंकर चारों धाम यहां
जिसने दर्शन राहें उतनी, चिंतान का चैतन्य भरा
पंथ खालसा गुरू पुत्रों की बलिदानी यह पुण्य धरा
अक्षय वट अगणित शाखाएं, जड में जीवन हिंदु हैं ॥१॥

कोटी हृदय हैं भाव एक हैं, इसी भूमि पर जन्म लिए
मातृभूमि यह कर्मभूमि यह, पुण्यभूमि हित मरे जिये
हारे-जीते संघर्षों में, साथ लढे बलिदान हुए
कालचक्र की मजबूरी में रिश्ते नाते बिखार गये
एक बडा परिवार हमारा, पुरखे सब के हिंदु हैं ॥२॥

सबकी रक्षा धर्म करेगा, उसकी रक्षा आज करें
वर्ण-भेद मत-भेद मिटा कर नव रचना निर्माण करें
धर्म हमारा जग में अभिनव, अक्षय है अविनाशी हैं
इसी कडी से जुडे हुए, युग युग से भारतवासी हैं
थाय अथाह जहां की महिमा, गहरा जैसे सिंधु हैं ॥३॥

हरिजन गिरिजनवासी बन के, नगर ग्राम सब साध चलें
उंच नीच का भाव घटा कर, समता के सद्भाव बढें
ऊपर दिखते भेद भले हों, जैसे वनमें में फूल खिले
रंग बिरंगी मुस्कानों से, जीवन रस पर एक मिले
संजीवनी रस अमृत पीकर, मृत्युंजय हम हिंदु है ॥४॥

### सनबर्न फेस्टिव्हल : अश्लीलता आणि अमली पदार्थांची रेलचेल

भारतीय संस्कृतीत, पाश्चात्य संस्कृतीने किती घट्ट पाय रोवले आहेत, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे डिसेंबरमध्ये मुंबईत होऊ घातलेला सनबर्न फेस्टिव्हल. या फेस्टिव्हलला यावर्षी मुंबईमध्ये आयोजित करण्यास महाराष्ट्र सरकारने परवानगी दिली आहे. २००७ मध्ये प्रथमच गोव्यात या फेस्टिव्हलने शिरकाव केला. २०१६ मध्ये पुणे आणि आता मुंबईत डिसेंबरमध्ये हा फेस्टिव्हल होत आहे. या कार्यक्रमात हजारोंचा सहभाग असतो. हजारो विदेशी पर्यटक भारतात येतात. त्यामुळे अत्यंत कमी अवधीत राज्याच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांची भर पडते. म्हणजे यात अर्थकारण आहे म्हणूनच ही उठाठेव. परंतु या फेस्टिव्हलमुळे येथील समाजात मद्य, अमली पदार्थ आणि अश्लीलता यांची विषवल्ली रुजते आणि फोफावते आहे हे सरकारला कळू नये याचे आश्चर्य वाटते! याचे किती दूरगामी परिणाम होतील, याची तमा न बाळगता केवळ तिजोरी भरण्यासाठी असल्या फेस्टिव्हल्सला परवानगी मिळत असेल तर छत्रपतींचा महाराष्ट्र म्हणवून घ्यायची आपली पात्रता आहे का? मागच्या वर्षी तिजोरी भरण्यासाठी मद्याची दारे गल्लोगल्ली उघडी केली आणि आता अशा फेस्टिव्हलमुळे अमली पदार्थ आणि अश्लीलता महाराष्ट्रात घराच्या उंबरठ्यावर आणून ठेवली. आधीच पुणे आणि मुंबईत अमली पदार्थांचे साठे सापडत आहेत.

## वाचक पत्रे

त्याकडे दुर्लक्ष करून पुन्हा तरुण पिढीला अशा फेस्टिव्हलच्या निमित्ताने नशाखोर बनवण्याचे काम सुरू आहे. इकडे लाडक्या बहिणी म्हणून गोंजारायचे आणि मद्य आणि अमली पदार्थांमध्ये त्यांच्या नवऱ्यांना आणि मुलांना गुंतवायचे. असे दुहेरी धोरण सध्या दिसते आहे. हे सर्व केवळ राज्य चालवण्यासाठी, आर्थिक गणिते मांडण्यासाठी योग्य वाटत असले, तरी त्यासाठी आपण तरुण पिढीचे भविष्य अंधारात लोटत आहोत, हे वेळीच कळले पाहिजे.

**माधवी पत्की**/नागपूर

●● ●●

### डिजिटल मनोरंजन आणि मुलांवरील त्याचे परिणाम!

आजच्या आधुनिक (डिजिटल) युगात सामाजिक माध्यमे आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. शिक्षण, रोजगार, व्यवसाय, मनोरंजन अशा प्रत्येक क्षेत्रात या माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. मनोरंजनाच्या क्षेत्राचा विचार करता युट्युब आणि नेटफ्लिक्स हे दोन्ही अत्यंत लोकप्रिय प्लॅटफॉर्म आहेत. दैनंदिन जीवनातील अनेक उपयुक्त गोष्टी शिकण्यासाठी युट्युबचा, तर चित्रपट, वेबसीरिज आणि डॉक्युमेंटरी पाहण्यासाठी नेटफ्लिक्सचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. मात्र, आजची वस्तुस्थिती अशी आहे की लहान मुलेही या माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करताना दिसतात. मुले नेमके कोणते व्हिडीओ पाहत आहेत, याकडे पालकांचे लक्ष नसल्यास या माध्यमांवर उपलब्ध असलेले हिंसक, अश्लील आणि अनैतिक दृश्यांचे व्हिडीओ पाहण्याची दाट शक्यता असते. याचा परिणाम मुलांच्या कोवळ्या मानसिकतेवर होतो. या स्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पालकांनी जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांच्या स्क्रीन टाईमवर लक्ष ठेवणे, योग्य कंटेंटची निवड करून देणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे गरजेचे आहे. तसेच शासनानेही याबाबत कडक नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यासंदर्भात नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने युट्युब आणि नेटफ्लिक्सवरील अश्लील सामग्री पाहण्यासाठी आधार कार्ड आवश्यक असावे, अशी महत्त्वाची शिफारस केली आहे. त्यामुळे लहान मुलांना चुकीच्या कंटेंटपासून दूर ठेवणे शक्य होईल. सर्वोच्च न्यायालयाने उचललेल्या या कठोर पावलामुळे मुलांबरोबरच तरुणांमध्येही पसरणाऱ्या चुकीच्या मानसिकतेवर निश्चितच आळा बसेल, अशी अपेक्षा आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### परभणी-बीड एसटी बसच्या चाकाचे नट निखळले; प्रवाशाच्या सतर्कतेमुळे मोठा अपघात टळला

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणीहून बीडकडे जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसच्या चाकाचे सर्व नट चालत्या गाडीमध्ये निखळून पडल्याची धक्कादायक घटना घडली. मात्र एका प्रवाशाने वेळीच चालकाच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्याने मोठा अपघात टळला.

आज परभणीहून बीडकडे जाणारी एसटी बस (क्रमांक एम.एच. १४ एम.एच.१९३७) परभणीहून रवाना झाल्यानंतर काही अंतरावर चालत्या बसच्या चाकाचे नट निखळून पडताना एका प्रवाशाला दिसले. त्याने तात्काळ चालकाला ही माहिती दिली. चालकाने तत्काळ बस थांबवून पाहणी केली असता संबंधित चाकाचे नट पूर्णतः निखळून पडल्याचे आढळून आले. प्रवाशाच्या प्रसंगावधानामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली असून, या घटनेमुळे एसटी महामंडळाच्या परभणी विभागाच्या देखभाल व दुरुस्तीतील हलगर्जीपणा पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. बसच्या सुरक्षिततेबाबत प्रवाशांमध्ये तीव्र चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

### रेणापुर पाटीजवळ दोन जड वाहनांची धडक; एकाचा जागीच मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील रेणापुर पाटीजवळ राज्य महामार्ग क्रमांक ६१ वर शुक्रवारी (दि. १२) रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमारास दोन जड वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात एका चालकाचा जागीच मृत्यू झाला. अशोक लेलँड कंपनीची गाडी क्रमांक एम.एच. ४४-५७५७ ही ऊसाची रिकामी गाडी घेऊन चालक समीर सय्यद (रा. परळी, जि.बीड) पाथरीकडे येत होता. याचवेळी पाथरीकडून नांदेडकडे जाणारे ट्रेलर (क्रमांक एम.एच. २६ ए.डी. ३५६७) हे वाहन चालक बाळासाहेब दाभाडे (रा. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) चालवत होते. रेणापुर पाटीजवळ या दोन्ही वाहनांची जोरदार समोरासमोर धडक झाली.या अपघातात अशोक लेलँड वाहनाचा चालक समीर सय्यद यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच स्थळापासून काही अंतरावर पोखर्णी फाटा येथे रात्रगस्तीवर असलेले पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्यासोबत सुनील लोखंडे, ११२ चे आगळे कर्मचारी व समीर शेख उपस्थित होते. पोलिसांनी जखमींना तात्काळ रुग्णवाहिकेद्वारे रुग्णालयात हलवले. तसेच रस्त्यावर विखुरलेले वाहनांचे तुकडे बाजूला काढून वाहतूक कोंडी दूर करण्यात आली. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या कडेला हलवण्याचे काम रात्री तीन वाजेपर्यंत सुरू होते. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे स्वतः घटनास्थळी उपस्थित होते. दरम्यान, मृतदेह पाथरी-रेणापुर पाटी दरम्यानच्या ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला असून, या भीषण अपघाताप्रकरणी पाथरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.

### संत व महापुरुषांच्या विचारांमुळेच सुसंस्कृत आणि जबाबदार तरुण पिढी घडते - शाहीर मुंजे

**परभणी,/प्रतिनिधी :** संत आणि महापुरुषांच्या विचारांचा व्यापक प्रसार होणे ही काळाची गरज असून, त्यातून समाजाला नैतिक बळ मिळते. त्यांच्या विचारांमुळेच सुसंस्कृत आणि जबाबदार तरुण पिढी घडते, असे प्रतिपादन शाहीर भारत मुंजे यांनी केले.

राणीसावरगांव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातर्फे इळेगाव येथे आयोजित सात दिवसीय विशेष वार्षिक शिबिरात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते मारोतराव काळे होते. व्यासपीठावर उपसरपंच प्रतिनिधी मारुती धापसे, कार्यक्रम अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, डॉ. अंगत घडमे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मार्गदर्शन करताना शाहीर मुंजे म्हणाले की, तरुणांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करून एक आदर्श आणि जबाबदार नागरिक म्हणून घडले पाहिजे. व्यसनांमुळे समाज आणि गावाची बदनामी होते. आई-वडिलांचे नाव उज्ज्वल करण्यासाठी शिक्षण हेच मुख्य साधन आहे. अभ्यासामुळे माणूस विचारवंत व आदर्श व्यक्तिमत्त्व बनतो. यासोबतच त्यांनी पाणी व्यवस्थापन, वृक्षारोपण तसेच पडिक जमिनीचा योग्य उपयोग कसा करता येईल, यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन रोशन घाडगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. कपिल लामतुरे यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मनपाच्या निषेधार्थ प्रहार जनशक्ती पक्षाचे 'परभणी शहर ग्रामपंचायत' नामकरण आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील कचरा, पाणीपुरवठा व आरोग्याच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यात महानगरपालिका पूर्णतः अपयशी ठरत असल्याचा आरोप करीत प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलन केले. महानगरपालिका शहराला सुविधा देण्याऐवजी शहर कचरा व खड्ड्यांमध्ये ढकलत असल्याचा आरोप करीत संतप्त कार्यकर्त्यांनी आज महानगरपालिकेचे प्रतीकात्मकरीत्या 'परभणी शहर ग्रामपंचायत' असे नामकरण केले. मागील चार वर्षांपासून शहरात प्रशासक राजवट असताना आणि जिल्ह्याचे पालकमंत्री परभणीचेच असतानाही महानगरपालिकेकडून कोणत्याही ठोस सुविधा नागरिकांना मिळाल्या.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# परभणीतील रस्त्यावर कचऱ्याचे ढिगच-ढिग

**मोहन धारासूरकर**
**परभणी,/प्रतिनिधी-** गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण शहरातील चोहो बाजूंच्या चौकांमधून, रस्त्या रस्त्यांवरुन तसेच वसाहतींमधून पुन्हा जागोजागी कचऱ्यांचे ढीगच्या ढीग साचले आहेत. तो केर कचरा वाऱ्याने रस्त्या रस्त्यांवर पसरत आहे. परंतु, कचरा संकलनाकडे खाजगी एजन्सीधारकाने नेहमीप्रमाणे पुन्हा अक्षम्य दुर्लक्ष सुरु करीत स्थिती गंभीर बनवली आहे.

महानगरपालिका हद्दीतील स्वच्छते बाबत प्रशासनाने खाजगी व्यक्ती, संस्थेस कंत्राट बहाल केले. परंतु, संबंधित कंत्राटदाराने आजपर्यंत अक्षरशः हात राखून काम केले. चोहोबाजूंच्या वसाहतीतील प्रमुख चौक किंवा प्रमुख रस्ते म्हणजेच दर्शनीय भागात घंटागाड्या तैनात केल्या खऱ्या परंतु, त्या केवळ देखाव्यापुरत्याच ठरल्या. प्रमुख चौक व प्रमुख रस्त्यांवरील काही स्पॉटवरील केर कचरा नियमितपणे हटविण्याचे काम इनामे इतबारे सुरु झाले खरे. परंतु, चोहोबाजूंच्या अंतर्गत वसाहतींमधून केर कचऱ्याचे ढीग हटविण्याच्या कामात संबंधित एजन्सीधारकाने कधीच गांभीर्याने स्वारस्य दाखविले नाही. कधीतरी कोणीतरी मोठी ओरड केली तर साफसफाई करीत आवाज बंद करण्याचा प्रयत्न मात्र या एजन्सीधारकाने इनामे इतबारे होत आला आहे.

सणा सुदीच्या काळातच या महानगरातील स्वच्छतेचे अक्षरशः तीन तेरा वाजले होते. प्रमुख चौक, प्रमुख रस्त्यांवर कचऱ्यांचे ढीगारे साचले. नाल्या आधीच तुंबल्या, त्यात हे कचऱ्यांचे ढीग नाल्यांसह रस्त्यांवर पसरले होते. दिवाळीच्या सणात हे चित्र प्रकर्षाने शहरवासीयांनी अनुभवले.



विशेषतः दिवाळी निमित्त आपल्या गावी परतलेल्या भूमीपुत्रांनी बकाल शहराचे हे चित्र ओळखल्यानंतर तीव्र संताप व्यक्त केला. कुचकामी रस्ते, ठिकठिकाणी कचऱ्यांचे ढीग, तुंबलेल्या नाल्या, डासांचा प्रादुर्भाव, सर्वदूर पसरलेली दुर्गंधी हे भयावह चित्र ओळखून या भूमीपुत्रांनी सोशल मिडीयातून महानगरपालिकेंतर्गत यंत्रणेवर, स्थानिक नेतेमंडळींवर, लोकप्रतिनिधींवर कडवट शब्दात प्रतिक्रिया व्यक्त केली. टीकेचा भडिमार केला. परंतु, त्या गोष्टीची मनपा असो, संबंधित एजन्सीधारक असो किंवा लोकप्रतिनिधींनी दखल घेतलीच नाही.

अलिकडे संबंधित कंत्राटदाराने घंटागाड्यांच्या फेऱ्यांना मर्यादा आणल्या आहेत. परिणामी कचरा संकलनाचे काम दिवसेंदिवस ठप्प होत आहे. कंत्राटदार विरुध्द महापालिका संघर्ष कायमस्वरुपी डोकेदुखीचा विषय आहे. कंत्राटदाराचे महिनोनमहिन्यापासून प्रशासनाद्वारे बिल अदा होत नाही, अशी ओरड सुरु केली. परंतु, आपण पूर्ण क्षमतेने काम करत आहोत, असा दावा ठोकून या कंत्राटदाराने महापालिकेंतर्गत काही झारीतील शुक्राचार्यांच्या आशिर्वादाने आव्वा की सव्वा रक्कमेची बिले नियमितपणे सादर करीत महापालिकेसमोर थकीत बिलांचा डोंगर उभा करुन दिला आहे. त्यामुळेच महापालिका प्रशासन सुध्दा कंत्राटदाराच्या या मुजोरपणामुळे हादरले आहे, हतबल झाले आहेत. मनपाअंतर्गत काही अधिकारी-कर्मचाऱ्यांचे या एजन्सीधारकाबरोबर साटेलोटे असल्याचा आरोप खूलेआमपणे होवून सुध्दा मनपाचे आयुक्त तथा प्रशासक या विषयात मौन बाळगून आहेत.

दरम्यान, संपूर्ण शहर तुंबलेल्या नाल्या, जागो जागी साचलेल्या कचऱ्यांच्या ढीगाऱ्यांमुळे, दुर्गंधीमुळे अक्षरः बकाल झाले आहे. पाथरी रस्ता, जिंतूर रस्ता, जूना पेडगाव रस्ता, दर्गा रस्ता, गंगाखेड रस्ता, रायपूर रस्ता, वसमत रस्ता, कारेगांव रस्ता, वांगी रस्ता, धार रस्ता, नांदखेडा रस्ता वगैरे परिसरात दूरपर्यंत पसरलेल्या वसाहतींमधून हे भयावह चित्र किळसवाणे दिसू लागले आहे. परंतु, महानगरपालिकेंतर्गत निगरगट्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्याचे सोयर सुतक नाही. बहुतांशी लोकप्रतिनिधींनाही त्याचे काहीही देणे घेणे नाही, असे दुर्देवी चित्र आहे.

## निपाणी टाकळीत बिबटया दिसल्याची चर्चा

**सेलू,/प्रतिनिधी:** पाथरी तालूक्यातील रेणाखळी येथे नोव्हेंबर महिन्यात दोन जनावरांचा फडशा पाडल्यानंतर बिबट्या पाथरी तालूक्यातील रेणाखळी लगत सेलू तालूक्यातील राधे धामण गाव,लाड नांदरा,हिस्सी, देऊळ गाव गात, दिग्रस जहांगीर आणि आता निपाणी टाकळी परिसरात अश्या अनेक ठिकाणी बिबट्या दिसत असल्याची चर्चा शेतकऱ्यांकडून होत असल्यामुळे तालुक्यात भितीचे वातावरण पसरले आहे.

मागील चार पाच दिवसांपासून बिबट्याचा रहिवास आज या गावी तर उद्या या गावी दिसत असल्याची तोंडी माहिती आणि चर्चा सर्वत्र सुरु झाली असून तालुक्यातील प्रत्येक खेड्यापाड्यातील शेतकरी, शेतमजूर यांच्या मध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्या मुळे शेतात काम करण्यासाठी कोणी यायला तयार नाही. त्यामुळे शेतातील सर्व कामे खोळंबली आहेत.मागील दोन दिवसांपासून वनविभागाकडून बिबट्याची चाचपणी करण्यात येत असून वनविभागाचे अंकुश जाधव हे प्रत्येक खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांना नागरिकांना प्रत्यक्ष भेटून बिबट्या आढळून आल्यास कोणती काळजी घ्यावी काय करावे या विषयी माहिती देण्याचे कार्य करत आहेत.नागरीकांनी सतर्क राहण्याचे अवाहन करण्यात आले आहे. सेलू तालूक्यातील शेतकरी अगोदरच वन्य प्राण्यामूळे त्रस्त झाले असून त्यामध्ये तालूक्यातील गावांच्या शेतशिवारात बिबट्याचा रहिवास असल्याच्या बातमीमूळे शेतकरी वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वाळू माफीया बाबतीत महसूल विभागाच्या दुर्लक्षावर ? कूभंकर्ण झोपेत ?

**विशेष प्रतिनिधी**
**सेलू,/प्रतिनिधी:** तालुक्यातील दुधना नदीपात्रातील सोन्ना, खादगाव, दिग्रस बु. आणि आंबेगाव दि. या चार गावांमधील वाळू घाटांचा लिलाव महसूल विभागाने पूर्ण केला.मात्र लिलाव नसलेल्या पिंपरी (बु) येथून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे.सदरिल गाव वाळू घाट लिलावाच्या यादीतच नाही, तरीही येथे अवैध उपसा दिवसेंदिवस वाढत असून, मोठ्या प्रमाणात वाळू वाहतूक केली जात आहे.

''लिलाव नाही, परवानगी नाही मग पिंपरी बुद्रुक मधून वाळू कोणाच्या आदेशाने निघते?''हा प्रश्न नागरीकांना पडत आहे. दरम्यान या प्रश्नावर महसूल विभाग शांत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.दिवसरात्र ८ हायवा ,२ जेसीबी मशीन सह दोन तराफाद्वारे सुरू असलेला अवैध वाळू उपसा व प्रशासनाकडून दिसणारी निष्क्रियता पाहता वाळूमाफीया व अधिकारी संगनमत असल्याची चर्चा होत आहे.''नियम तर आहेत, पण अंमलबजावणी कुठेच नाही'' असा थेट सवाल ग्रामस्थांनी केला आहे.एकीकडे महसूल विभागाने चार गावातील वाळू घाटाचा लिलाव केला मात्र जर काही वाळूमाफीया अशा पद्धतीने जर अवैध वाळू उपसा करत असतील तर वाळू घाटाचे लिलाव करून रायल्टीची रक्कम शासनास भरणा-या ठेकेदारांनी करायचे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. महसूल विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष की कुणाचा वरदहस्त?

लिलावात नसलेल्या पिंपरी बुद्रुकमधील अवैध वाळू उपसा आणि प्रशासनाची निष्क्रियता यामुळे महसूल विभागाच्या कामकाजावर गंभीर संशयाचे ढग दाटले आहेत. ग्रामस्थांचा ठाम आग्रह ''प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी आणि बेकायदा उपसा आटोक्यात आणावा.''अशी मागणी ग्रामस्थ करत असतांना देखील वाळूमाफीयांची मूजोरी काही कमी होत नाही.जर राजरोसपणे जिसीबी,हायवा व तराफ्याच्या साह्याने दूधना नदीपात्रातून पिंपरी (बू) येथून वाळू घाट लिलावात नसतांना अवैध वाळूचा उपसा करण्यात येत असून त्या अवैध वाळू उपसावर निर्बंध घालून वाळूमाफीयावर कारवाही होणे गरजेचे आहे.

पिंपरी (बू) दूधना नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करण्यात येत असल्याने महसूल विभागाने लिलावाव्दारे जर वाळूघाट सोडण्यात आला तर ग्रामपंचायतीला महसूल विभागाकडून गावात सूधारणा करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो दरम्यान जर परवानगी न घेता अवैध वाळू उपसा होत असेल तर ग्रामपंचायतचा महसूल बूडत असल्याने गावाची सूधारणा कशी करणार असा प्रश्न ग्रामपंचायतला पडत असून सदरिल अवैध वाळू उपसा करणा-यावर कारवाही करण्याची मागणी जोर धरत आहे.



जिंतूर- येथे संत श्री रंगनाथ महाराज परभणीकर गुरुजी यांच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक हेथे पुण्यतिथी निमित्त भक्ती रिंगन संपन्न झाले

## जिंतूर प्रेस क्लबचे विभागीयस्तरीय दर्पण पुरस्कार जाहीर

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर तालुका प्रेस क्लबच्या वतीने दर्पण दिनानिमित्त देण्यात येणारे दर्पण पुरस्कार जाहीर करण्यात आले असून सामाजिक वार्ता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार अनिल कसबे आवर्ती संपादक देशोन्नती नांदेड यांना तर विकास वार्ता पुरस्कार बाबुराव चव्हाण उपसंपादक लोकमत धाराशिव यांना जाहीर करण्यात आला असून ११ जानेवारी २६ रोजी एका भव्य कार्यक्रमात आयबीएन लोकमतचे संपादक विलास बडे यांच्या उपस्थितीत हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

जिंतूर तालुका प्रेस क्लबच्या वतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी जिंतूर करांसाठी साहित्यिक मेजवानीचे आयोजन केले जाते .याहीवर्षी ११ जानेवारी २०२६रोजी सायंकाळी सहा वाजता जुनी





मुन्सबी, भाजी मंडी जिंतूर या ठिकाणी एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी आयबीएन लोकमतचे संपादक विलास बडे कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राहणार आहेत.

दरवर्षी तालुका प्रेस क्लबच्या वतीने मराठवाडा विभागातील पत्रकारिता क्षेत्रामध्ये योगदान देणाऱ्या व निर्भीडपणे लिखाण करणाऱ्या दोन पत्रकारांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर सामाजिक वार्ता दर्पण पुरस्कार व आचार्य बाळशास्त्री जांभेकर विकास वार्ता दर्पण पुरस्कार देण्यात येतो यापूर्वी अभिमन्यू कांबळे, संतोष धारासूरकर ,राजाभाऊ नगरकर ,सुरज कदम वसंत भट सुरेश जम्पंनगीरे, मारुती झुंबडे ,फकीरा देशमुख ,बालाजी मारगुडे, नामदेव खेडकर ,विकास राऊत यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे यावर्षी सामाजिक वार्ता पुरस्कार नांदेड देशोन्नती आवर्ती संपादक अनिल कसबे यांना तर विकास वार्ता पुरस्कार बाबुराव चव्हाण उपसंपादक लोकमत धाराशिव यांना जाहीर करण्यात आला आहेत. हे दोन्ही पुरस्कार याच कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे.पुरस्काराचे स्वरूप रोख प्रत्येकी पाच हजार रुपये , सन्मानचिन्ह ,जांभेकर पगडी ,पुष्पहार शाल असे आहेत. या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिंतूर तालुका प्रेस क्लबच्या वतीने करण्यात आले आहेत.

## दीपक खुडे यांची प्रहार जनशक्ती पक्षाच्या पाथरी तालुका प्रमुख पदावरून व पक्षातून हकालपट्टी..

**परभणी,/प्रतिनिधी:** नुकत्याच झालेल्या पाथरी नगरपरिषद निवडणुकीमध्ये प्रहार जनशक्ती पक्षाने राष्ट्रीय समाज पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना पाठिंबा जाहीर दिलेला होता. याबाबत पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा. बच्चुभाऊ कडू यांनी लेखी आदेश काढले होते व या आदेशाची माहिती पाथरी तालुकाप्रमुख दीपक खुडे यांना देण्यात आली होती. राष्ट्रीय समाज पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे लेखी आदेश असतानाही प्रहार जनशक्ती पक्षाचे पाथरी तालुका प्रमुख दीपक खुडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार श्री राजेश दादा विटेकर यांची भेट घेऊन पक्षाच्या आदेशाविरुद्ध जाऊन पाथरी तालुका प्रहार जनशक्ती पक्षाचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारास जाहीर पाठिंबा देण्यात आल्याचे पत्र स्वतःच्या लेटर पॅड वर तयार करून पाठिंबा दिला. याबाबत सोशल मीडियावर बातम्या पण प्रसारित करण्यात आल्या. झालेल्या सर्व घटनाक्रम ची माहिती जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने पक्षाकडे पुराव्यासह दिल्यानंतरच प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री. बच्चुभाऊ कडू यांच्या आदेशाने व राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा. श्री. बल्लूभाऊ जवंजाळ यांच्या सूचनेनुसार दीपक खुडे यांची प्रहार जनशक्ती पक्षाच्या पाथरी तालुका प्रमुख पदावरून तसेच प्रहार जनशक्ती पक्षातून हकालपट्टी करण्यात येत असल्याचे पत्र आज प्रहार जनशक्ती पक्षाचे परभणी जिल्हाप्रमुख यांनी काढले आहेत. हकालपट्टीचे पत्र निघाल्या तारखेपासून दीपक खुडे यांनी प्रहार जनशक्ती पक्षाचे नाव, पक्षाचे चिन्ह व मा.श्री.बच्चुभाऊ कडू यांच्या नावाचा कुठेही वापर करू नये अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल असेही या हाकालपट्टी पत्रात म्हटले आहे.

## पालम येथे भाजप युवा मोर्चाची बैठक

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** येथे भाजपा युवा मोर्चाची बैठकीचे आयोजन करण्यात आली होते ही बैठक भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयामध्ये घेण्यात आली होती. या बैठकीला भाजपा युवा मोर्चाचे परभणी जिल्हाध्यक्ष देवा शिंदे उपस्थितीत पालम तालुक्यातील होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका जिल्ह्याच्या नेतेच्या नेतृत्वात जिल्हा सह व पालम तालुक्यातील जि प व पं स स्वबळा लढवणार असून त्यासंदर्भात बैठक घेण्यात आली यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन लांडगे युवा मोर्चा अध्यक्ष शिवानंद गव्हाणे,गोपीनाथ तुडमे, हनुमंत देशमुख, रूपेश शिनगारे, राम गावंडे हरीशचंद्र साबळे, तुकाराम रानगिरे,गोविंद किरडे, अक्षय गडगीळे, विशाल जाधव आदी उपस्थित होते.




## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा जांब (बु.)च्या अभूतपूर्व शैक्षणिक सहलीची जिल्हाभर चर्चा

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा जांब (बु.) येथील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या चार दिवसीय शैक्षणिक सहलीची सध्या संपूर्ण जिल्ह्यात चर्चा सुरू आहे. सोमवार, दिनांक ८ ते ११ दरम्यान झालेल्या या सहलीत धार्मिक, ऐतिहासिक तसेच मनोरंजनात्मक स्थळांचा समावेश करण्यात आला होता.

सहलीच्या पहिल्या टप्प्यात पैठण येथे धरणाची माहिती देत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहणी घडवून आणण्यात आली. त्यानंतर देवगड येथे दर्शन घेऊन विद्यार्थ्यांना बोटिंगचा आनंद देण्यात आला. पुढे शनी शिंगणापूर व शिर्डी येथे दर्शन घेऊन मुक्काम करण्यात आला. दुसऱ्या दिवशी रांजणगाव गणपती, देहू-आळंदी येथे दर्शन तसेच मुक्काम करण्यात आला. पुढे लोणावळ्याला भेट देत कोकणातील खोपोली येथे इमॅजिका थीम पार्कमध्ये पूर्ण दिवस विविध राईड्स व खेळांचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. इमॅजिका थीम पार्कची प्रतिविद्यार्थी शुल्क १,४०० रुपये असतानाही सहशिक्षक राजेश चव्हाण यांच्या प्रयत्नातून हे शुल्क केवळ १,०५० रुपयांत निश्चित करण्यात आले. इमॅजिका पार्कमधील विविध राईड्समुळे विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची इमॅजिका थीम पार्कला झालेली ही पहिलीच भेट ठरली.



या सहलीत विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही मनसोक्त आनंद घेतला. सहलीचे संपूर्ण नियोजन सहशिक्षक राजेश चव्हाण यांनी केले, तर मुख्याध्यापक पंढरीनाथ सानप यांच्यासह कांबळे, गरड, साबळे व तरटे यांनी परिश्रम घेतले. या अभूतपूर्व उपक्रमाचे कौतुक जिंतूर तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी त्र्यंबक पोले यांनी केले. शाळेतील शिक्षक नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवतात, असे त्यांनी सांगितले. उत्कृष्ट नियोजनाबद्दल सहशिक्षक राजेश चव्हाण यांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले. या सहलीमुळे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा जांब (बु.) ने शैक्षणिक उपक्रमांत नवा आदर्श निर्माण केला आहे.

''शाळेत रुजू होऊन दीड वर्षात विविध उपक्रम राबवले. दहीहंडी, गॅदरिंग, नवोदय परीक्षेची तयारी आणि आता ही सहल गावकऱ्यांनाही आवडली. सहलीतील प्रत्येक विद्यार्थ्याचे व्हिडिओ तयार केल्याने पालक व ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. यापुढेही असेच विविध उपक्रम राबविणार आहोत.''
सहशिक्षक : राजेश चव्हाण, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा जांब (बु.)

# शास्त्री विद्यालयात वैदिक मानवता संस्कार व्याख्यानमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि.१५ डिसेंबर**

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात वैदिक मानवता संस्कार व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.



याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासुणे ,प्रमुख पाहुणे पंडित प्रतापसिंह चव्हाण ,व्याख्याते पंडित मनुदेवजी शास्त्री, प्रा. नरेंद्र शिंदे, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार ,किरण नेमट या सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

याप्रसंगी पंडित प्रतापसिंह चव्हाण यांनी मुलांनी सरळ मार्गाचा अवलंब करावा गुरुजनांचा आई-वडिलांचा सन्मान करावा व आपला विकास साधावा या सर्व विषयावर आधारित भजन सादर केले.

व्याख्याते पंडित मनुदेवजी शास्त्री यांनी आपल्या व्याख्यानातून शिक्षणाचा उद्देश सांगितला. शिक्षणाबरोबर संस्कार अत्यंत महत्त्वाचे आहेत .ध्येय मोठे ठेवा त्याप्रमाणे मेहनत करा मनाने जिंका नक्कीच जिंकाल सकारात्मक विचार करा आपल्या कामात सातत्य ठेवा अत्यंत सहज सोप्या शब्दात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरेंद्र शिंदे यांनी केले .सूत्रसंचालन व स्वागत परिचय अनिता यलमटे यांनी केले . आभार किरण नेमट यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थेतील सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले संपूर्ण वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# श्री संकल्प सिद्धी गणेश मंदिरचा २८ वा वर्धापन दिन निमित्ताने भव्य पालखी सोहळा उत्सव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ डिसेंबर**




पेठ बीड भागातील बुरुड गल्ली एक स्तंभीय व तीन मजली असा श्री संकल्प सिद्धी गणेश मंदिराचे २८ वे वर्धापन दिन मोठ्या उत्साह व आनंद पूर्ण वातावरणात दिनांक १६ व १७डिसेंबर २०२५ या दोन दिवसीय उत्सवने साजरा करण्यात येणार आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्ताने भरगच्च विविध कार्यक्रमाची रेल चल राहणार आहे. त्यामध्ये दिनांक १६ डिसेंबर रोजी पहाटे पासून विविध धार्मिक व वैदिक कार्यक्रमाची सुरुवात केली जाणार आहे. ती मध्ये सहस्त्र आवर्तन, गणेश अथर्वशीर्ष व महा अभिषेक असा भव्य कार्यक्रम होणार असून संध्याकाळी सहा वाजता भव्य पालखी सोहळा पेठ बीड परिसरात होणार आहे. दिनांक १७रोजी सकाळी विविध धार्मिक विधी ,पूजापाठन सोहळा करण्यात येणार असून दुपारी एक ते चार वाजेपर्यंत महाप्रसादाचे वाटप मंदिर परिक्षेत्रामध्ये करण्यात येऊन या उत्सव सोहळ्याची सांगता होईल या उत्सवाचा लाभ सर्व गणेश भक्तांनी घ्यावा असे आवाहन श्री संकल्प सिद्धी गणेश मंदिर विश्वस्तानी व आझाद हिंद गणेश मंडळाचे सर्व जेष्ठ व विद्यमान पदाधिकारी,सभासदांनी केले आहे.

# भारतीय जनता मजदुर संघाचे मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील यांचा विष्णु भाऊ घुले यांच्या हस्ते सत्कार संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१५ डिसेंबर**

भारतीय जनता मजदुर संघाच्या मराठवाडा सचिव पदावर निवड झाल्याबद्दल चंद्रकांत पाटील यांचा विष्णु भाऊ घुले यांच्या सह मित्र परिवार यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी पत्रकार धनंजय कुलकर्णी मिडिया वार्ता मुंबई जिल्हा प्रतिनिधी बीड तथा दैनिक नवराष्ट्र तालुका प्रतिनिधी किल्ले धारूर,अभय जोशी दैनिक पार्श्वभूमी तालुका प्रतिनिधी अंबाजोगाई,संतोष घुले, अमोल मुळे,सरपंच उमरी, मल्हारी बारगजे,चंदुलाल मिसाळ,अप्पासाहेब आंधळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



याप्रसंगी बोलताना भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते केज पंचायत समितीचे माजी सभापती विष्णु भाऊ घुले यांनी सांगितले की,आमचे मित्र पत्रकार चंद्रकांत पाटील यांना भारतीय जनता मजदुर संघाच्या वतीने गोरगरीब मजुर तसेच असंघटित क्षेत्रातील कामगार व त्यांच्या परिवाराला सेवा सुविधा देण्यासाठी संधी मिळाली असून त्याचा उपयोग गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या सत्काराला उत्तर देताना पत्रकार चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री शांत प्रकाशजी जाटव साहेब, राष्ट्रीय सचिव श्री. भाऊसाहेब घोडके सर, महाराष्ट्र राज्याचे सचिव श्री.धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा पातळीवर असंघटित क्षेत्रातील कामगार तसेच छोटे व्यापारी यांच्या प्रगती साठी सदैव कार्यरत रहाणार असुन शासकीय सुविधा मिळवुन देण्या साठी सतत प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच आपण केलेला सत्कार हा पाठबळ देणारा आहे त्यामुळे सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

# ऊस दरावरून शेतकऱ्यांनी रोकला राष्ट्रीय महामार्ग

## तास रास्ता रोको; वाहतूक पूर्ण ठप्प
## अपेक्षित दर न मिळाल्यास ऊस पुटवठा बंद करणार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१५ डिसेंबर**



बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यासह सोनपेठ, गंगाखेड परिसरातील असंख्य शेतकऱ्यांचा ऊस गाळप करण्याऱ्या गंगाखेड येथील जी ७ साखर कारखाना व लक्ष्मी नृसिंह साखर कारखान्याने सुरू असलेल्या गळीत हंगामात पहिली उचल ३ हजार व अंतिम भाव ४ हजार रु देण्यात यावा याकरिता सोमवार दि १५ रोजी राष्ट्रीय महामार्गावर रास्तारोको केले. सलग ५ तासापासून हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी रस्त्यावर ठिय्या मांडल्याने परळी-परभणी मार्गावरील वाहतूक पूर्ण ठप्प होऊन असंख्य वाहनांच्या रांगा दुतर्फा लागलेल्या होत्या. मागण्याकरिता जिल्हाधिकारी स्तरावर बैठक आयोजित करण्यात आल्याने हे रास्ता रोको स्थगित करण्यात आले आहे. साखर कारखान्याने अपेक्षित दर न दिल्यास ह्या कारखान्यावर ऊस न देता बहिष्कार टाकण्याचा मानसिकतेत ऊस उत्पादक शेतकरी असून कारखान्याना ऊस पुरवठा करण्याऱ्या गावात याबाबत बैठक देखील शेतकरी घेणार आहेत.

वाढती महागाई, खते व निविष्ठा दरवाढ यामुळे उत्पादन खर्चात लक्षणीय वाढ झाली असून कृती समितीने बीड जिल्ह्यात केलेल्या आंदोलनाची गंभीर दखल घेत जिल्ह्यातील सर्वच साखर कारखाने व परभणी जिल्हयातील बहुसंख्य साखर कारखाना यांनी आश्वासन दर देऊन खात्यावर देयक अदा केले असताना गंगाखेड येथील जी ७ व लक्ष्मी नृसिंह साखर कारखान्याने ऊसाला किमान प्रति टन ३००० रूपये एक रक्कमी पहिली उचल तर ४००० रूपये अंतिम दर देण्यात यावा या मागणीकरिता हा रस्ता रोको करण्यात आला होता. भर उन्हात हजारो शेतकरी रस्त्यावर ठिय्या मांडून होते. मागण्या मान्य झाल्याशिवाय मागार नाहीच या भूमिकेतून आंदोलनाला आलेल्या शेतकऱ्यांनी घरून बांधून भाकरी रस्तावर सोडून जेवण केले. दरम्यान घटनेचे गांभीर्य ओळखून परभणीचे जिल्हाधिकारी यांनी गंगाखेड येथील तहसील प्रशासन, पोलीस प्रशासन यांना मध्यस्ती करायला सांगत बुधवार दि १७ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी बारा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करून मागण्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

# गणेश कुलकर्णीच्या कन्येच्या विवाहात ध्वजारोहण करून आहेराची रक्कम सैनिकांच्या कुटुंबासाठी देण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ डिसेंबर**

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे . या राज्यात विविध जाती-धर्माचे महापुरुष व संत महंत होऊन गेले . या भूमीत विवाहप्रसंगी विविध प्रकारचे उपक्रम, शासनाच्या विविध योजना विवाह पत्रिकेच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न होत असतो .



असाच एक उपक्रम गेवराई येथील गणेश चंद्रकांतराव कुलकर्णी या दांपत्याने आपल्या मुलीचा विवाह तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करून पार पाडला.

तसेच कुठल्याही प्रकारचा आहेर न स्वीकारता जे आहेर देऊ इच्छितात त्यांच्यासाठी निमंत्रण पत्रिकेत टीप टाकण्यात आली होती .

ज्यांना आहेर करायचेच असतील त्यांनी मंडपात वाटप केलेल्या क्यू आर कोडवर देशातील माजी सैनिकांच्या कुटुंबीयांच्या मदतीसाठी आवश्यक तेवढी रक्कम टाकावी जेणेकरून सैनिकांच्या कुटुंबाला आधार ठरेल .असा उपक्रम राबविण्यात आला.

गेवराई येथील शहीद कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी यांची पुतणी आणि मंजुषा व गणेश चंद्रकांतराव कुलकर्णी यांची सुकन्या कृष्णाली हिचा विवाह ३० नोव्हेंबर रोजी गेवराई येथील भाग्यलक्ष्मी लॉन्स येथे दुपारी १२ वाजून २१ मिनिटांनी श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्रीमती अलका कुमार बडवे यांचे चिरंजीव शारंग यांच्यासमवेत पार पडला.

या समारंभास ६०० ते ७०० वऱ्हाडी उपस्थित होते . गणेश कुलकर्णी यांनी विवाहाच्या पत्रिकेमध्ये कृपया कोणीही आहेर आणू नये . याउपरही कुणाची इच्छा असल्यास मंडपात वाटप केलेल्या क्यू आर कोडवर वाटेल तेवढी रक्कम टाकून दिल्यास भारतीय सैनिकांच्या कुटुंबीयांच्या मदतीसाठी ती रक्कम पाठविण्यात येईल, असे आवाहन केले होते. त्याला अनुसरून जवळपास १ लाख ३५ हजार रुपयांच्या जवळपास रक्कम जमा झाली . वधू पिता गणेश कुलकर्णी हे आणखी ६५ हजार रुपये टाकून २ लाख रुपयाचा धनादेश सैनिकांच्या कुटुंबाच्या आधारासाठी संबंधित यंत्रणेकडे सोपविणार आहेत .

दरम्यान वधू आणि वरांचे विवाह मंचावर आगमन होताच मंगलाष्टकांच्यापूर्वी वधू आणि वरांच्या हस्ते भारतीय तिरंग्याचे ध्वजारोहण राष्ट्रगीत म्हणून करण्यात आले . आणि त्यानंतर विवाह सोहळा पार पडला.

सौ मंजुषा व गणेश चंद्रकांतराव कुलकर्णी धाराशिवकर व पुजारी परिवार बडवे पंढरपूरकर यांच्या या विवाह सोहळ्यात केलेल्या या अभिनव उपक्रमाबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# प्रसाद चिक्षे यांची मराठवाडा पातळीवरील लोकसेवा पुरस्कार २०२५ साठी निवड

**२४ डिसेंबर ला होणार वितरण**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ डिसेंबर**

ज्ञान प्रबोधिनीचे कार्यकर्ते प्रसाद दादा चिक्षे यांना धाराशिव येथील लोकसेवा समितीचे वतीने मराठवाडा पातळीवरील देण्यात येणाऱ्या लोकसेवा पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. २४ डिसेंबर रोजी धाराशिव येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



लोकसेवा समितीचे वतीने या संदर्भात प्रसाद चिक्षे यांना सदरील पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे पत्र देण्यात आले असून त्यात पुढे असे म्हटले आहे की, लोकसेवा समिती धाराशिव ही संस्था मागील तीन दशकांपासून धाराशिव जिल्ह्यात शिक्षण तसेच जलसंधारण, कृषी, आरोग्य, कुटुंब कल्याण आदी क्षेत्रात काम करणारी एक अग्रणी सामाजिक संस्था आहे. या संस्थेतर्फे दरवर्षी माजी पंतप्रधान भारतरत्न श्रद्धेय कै. अटल बिहारी बाजपेयी यांच्या जन्मदिनी (२५ डिसेंबर) समाजातील निरपेक्ष भावनेने कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचा 'लोकसेवा पुरस्कार' देऊन गौरव करण्यात येतो. हे या पुरस्काराचे १६ वे वर्ष आहे.

आपण मागील ३० पेक्षा जास्त वर्षांपासून करीत असलेल्या सामाजिक कामाची, तसेच शिक्षण, जल-संधारण, भटके-विमुक्त जाती-जमातीच्या उन्नतीसाठी केलेल्या कामाची दखल घेऊन लोकसेवा पुरस्कार समितीने यावर्षीच्या 'लोकसेवा पुरस्कार २०२५' साठी आपली निवड केली आहे. आपण हा पुरस्कार स्वीकारावा ही विनंती.

सदरील पुरस्कार वितरण सोहळा

२४ डिसेंबर२०२५ वेळ दुपारी ४.०० वाजता धाराशिव येथील प्रमोद महाजन सभागृह, आर्य चाणक्य विद्यालय परिसर, वरुडा रोड, धाराशिव येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.या निवड पत्रावर ऍड. मिलिंद पाटील, अध्यक्ष, कमलाकर पाटील, सुनील आणि डॉ. अभय शहापूरकर, उपाध्यक्ष लोकसेवा समिती, धाराशिव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ज्ञानबोधिनी शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करत असलेले प्रयत्न कौतुकास्पद ; अश्विन मोगरकर

## ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालय पालक सुसंवाद मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१५ डिसेंबर**

इंग्रजी शाळेच्या तोडीस तोड शिक्षण देणाऱ्या ज्ञानबोधिनी विद्यालयाच्या सृजनशील शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असून शाळेने आतापर्यंत हजारो यशस्वी विद्यार्थी घडवले आहेत असे प्रतिपादन ज्ञानबोधिनी विद्यालय (गणेशपार विभाग) आयोजित पालक सुसंवाद मेळाव्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष अश्विन मोगरकर यांनी केले.



शहरातील अखिल भारतीय संस्कृत प्रचारिणी संस्था कृष्णानगर ,परळी वै.संचलित, ज्ञानबोधिनी प्राथमिक शाळा,गणेशपार विभागात इयत्ता १ली ते ७वी या वर्गाचा पालक सुसंवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या पालक सुसंवाद मेळाव्याचे अध्यक्ष अश्विन मोगरकर, प्रमुख अतिथी सौ.सुरेखा देशमुख, ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे सर, संस्थेचे उपाध्यक्ष प्रशांत मुंडे सर, श्री.शेप सर, प्रमुख पाहुणे पालक प्रतिनिधी श्री.अनंत कुलकर्णी, विनोद कानेगाकर, मयुरी चाटूफळे, दमयंती गिरी, शाहिस्ता खान यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्ज्वलन करण्यात आले.यावेळी शाळेत राबविले जाणारे गणित,इंग्रजी, भूगोल,मराठी या विषयावर आधारीत शैक्षणिक उपक्रम सादर करण्यात आले.

पालक सुसंवाद मेळाव्याचे अध्यक्ष अश्विन मोगरकर यांनी शाळेविषयी आपले मत व्यक्त केले. विध्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना नेहमी या शाळेत वाव दिला जातो शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला.त्यासाठी या शाळेत होणाऱ्या सांस्कृतिक,समाजिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिन विकास होतो. तसेच शाळेत राबवले जाणारे उपक्रम व अभ्यासक्रम याविषयी शाळेचे कौतुक केले.

पालक मेळाव्यात अनेक पालकांनी शाळेविषयी व संस्थेचे मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे हे राबवित असलेल्या शैक्षणिक उपक्रमाविषयी विशेष कौतूक केले. अल्पावधीतच शाळेने निर्माण केलेल्या शैक्षणिक गुणवत्तेबद्दल व राबवत असलेल्या संस्कृती व शैक्षणिक उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

या शाळेची आणखी सर्वांगीण प्रगती करण्यासाठी पालक स्वतः पुढे आले आहेत. शाळेसाठी सर्व मदत करण्याची सर्व पालकांची मानसिकता आहे. शिक्षण मात्र उच्च दर्जाचे आहे. असे अनुभव या शाळेविषयी अनेक पालकांनी व्यक्त केले. शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन, भारतीय संस्कृतीची जपवणूक करण्यासाठी विविध सणाला अनुसरून घेतले जाणारे सांस्कृतिक उपक्रम ,विविध स्पर्धा, मुलांची आरोग्य तपासणी , शैक्षणिक सहल हे सर्व उपक्रम शाळेने पालकांच्या सहकार्याने घेतले आहेत. मुलांची शैक्षणिक व स्पर्धा परीक्षेतील प्रगती सुद्धा उत्तम असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे सर यांनी बोलताना सांगितले, आम्ही शाळेतील प्रवेश वाढविण्यासाठी साठी आम्ही प्रयत्न करणार, पालकांच्या माध्यामातून शाळेचा दर्जा वाढवू, पालकांनी सहकार्य केले तर शाळा निश्चितच यापेक्षाही जास्त गुणवत्ता व दर्जा येणाऱ्या काळामध्ये सिद्ध करेल. शैक्षणिक वर्षात अतिशय काटेकोर शैक्षणिक नियोजन करून शाळेचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

याप्रसंगी श्री.जाधव सर यांनी पालकांना मार्गदर्शन केले सर्व उपस्थित मान्यवरांनी शाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले.यानंतर महिला पालक यांनी शाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाची सांगता राज्यगीताने केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्रे सर यांनी तर प्रास्ताविक वाघमोडे मॅडम यांनी केले विविध उपक्रमाचे सूत्रसंचालन गवंडगावे सर व मुंडे मॅडम यांनी केले तर आभार घोडके मॅडम यांनी मानले शाळेतील क्षीरसागर सर, आलापुरे सर, धुमाळ सर, खोत मॅडम, सूर्यवंशी, गित्ते, शेप मॅडम घोळवे मॅडम सर्व कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

# विजय दिवस : राष्ट्राच्या शौर्याचा, त्यागाचा आणि ऐक्याचा अमर गौरव

भारताच्या इतिहासात १६ डिसेंबर हा दिवस अभिमानाने उजळून निघतो. विजय दिवस म्हणून साजरा होणारा हा दिवस १९७१ च्या भारत-पाक युद्धातील ऐतिहासिक विजयाचे स्मरण करून देतो. हा विजय केवळ रणांगणावरील नव्हता ; तो मानवतेचा , न्यायाचा आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूल्यांचा विजय होता. या युद्धातून बांगलादेशाचा जन्म झाला आणि भारताने दक्षिण आशियातील राजकीय नकाशा बदलून टाकला.



१९७१ मध्ये तत्कालीन पूर्व पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या अत्याचारांमुळे लाखो निर्वासित भारतात आले. मानवी संकटाच्या या पार्श्वभूमीवर भारताने धैर्याने उभे राहत अन्यायाविरुद्ध भूमिका घेतली . भारतीय लष्कराने केवळ सैनिकी कौशल्य नव्हे , तर शिस्त , संयम आणि रणनीतीचे सर्वोच्च दर्शन घडवले . १३ दिवसांच्या निर्णायक युद्धानंतर १६ डिसेंबर १९७१ रोजी ढाका येथे पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली . जवळपास ९३ हजार पाकिस्तानी सैनिकांनी शस्त्रे खाली ठेवली – हा दुसऱ्या महायुद्धानंतरचा सर्वात मोठा शरणागतीचा प्रसंग मानला जातो.

विजय दिवस हा सैनिकांच्या पराक्रमाइतकाच त्यांच्या त्यागाचा दिवस आहे . सीमेवर उभे राहून मातृभूमीचे रक्षण करणाऱ्या जवानांचे धैर्य , कुटुंबापासून दूर राहून केलेले बलिदान , आणि राष्ट्रासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीरांची आठवण – या सर्वांचा हा सन्मानदिन आहे . भारतीय नौदल , वायुदल आणि थलसेना – तिन्ही दलांनी समन्वयाने काम करून शत्रूची कोंडी केली . हा विजय संयुक्त शक्ती , नियोजन आणि नेतृत्व यांचा परिणाम होता .

विजय दिवस आपल्याला राष्ट्रीय ऐक्याचे महत्त्व शिकवतो . संकटाच्या काळात देश एकत्र उभा राहिला , राजकीय मतभेद बाजूला ठेवले गेले , आणि मानवतेच्या बाजूने ठाम भूमिका घेतली गेली . याच मूल्यांमुळे भारत आजही शांतता , लोकशाही आणि मानवी हक्कांचा समर्थक म्हणून ओळखला जातो .

आज विजय दिवस केवळ इतिहासाची आठवण नाही ; तो भविष्यासाठी प्रेरणा आहे . तो आपल्याला सांगतो की स्वातंत्र्य , सार्वभौमत्व आणि शांतता टिकवण्यासाठी सज्जता आवश्यक असते . सैनिकांचा सन्मान करणे , त्यांच्या कुटुंबांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे , आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च मान देणे – हाच विजय दिवसाचा खरा अर्थ आहे.

विजय दिवसाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया –

राष्ट्राच्या एकतेला जपू ,
अन्यायाविरुद्ध आवाज उठवू ,
आणि देशासाठी झटणाऱ्या प्रत्येक जवानाच्या त्यागाला मान देऊ .


विजय दिवस चिरायू होवो ! भारत माता की जय!

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

# बीड शहर व परिसरातील बारवांना राज्य बारव बचाव समितीची सदस्य श्री. रोहन काळे यांची प्रत्यक्ष पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ डिसेंबर**

बारव निर्मिती ही तत्कालीन राज्यकर्त्यांची उत्कृष्ट जलनीती होती. होळकरशाहीतील थोर शासनकर्ती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बारव निर्मितीचे भारतभर जाळे निर्माण केलेले आहे.



काळाच्या ओघात दुर्लक्षामुळे बारवा नामशेष होत चालल्या आहेत. बारवांचे जतन व संवर्धन करणे म्हणजे केवळ जलसाठा टिकवणे नव्हे, तर इतिहास जिवंत ठेवणे होय. हाच विचार घेऊन शासन स्तरावर महाराष्ट्र बारव समिती गठित करण्यात आली आहे. बारव संवर्धनासाठी स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

राज्यस्तरीय महाराष्ट्र बारव समितीचे अशासकीय सदस्य श्री. रोहन काळे (मुंबई) यांनी बीडला भेट दिली. यावेळी त्यांनी खंडेश्वरी मंदिर बारव, फुलईनगर येथील कलिंदेश्वर बारव, पापनेश्वर बारव, शनी मंदिर बारव, पेठ बीड येथील चमन बाग तसेच शिदोड परिसरातील बारवांची प्रत्यक्ष पाहणी केली.

या प्रसंगी श्री. रोहन दादा काळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र बारव मोहीम बीड जिल्हा समन्वयक पदी सचिन लुचारे यांची निवड करण्यात आली. बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र बारव मोहीम व स्वच्छता मोहिमेमध्ये सक्रिय असणाऱ्या आई तुळजाभवानी प्रतिष्ठान, बीडचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते.

बारव भेटीच्या वेळी अंबड येथील होळकरशाही अभ्यासक रामभाऊ लांडे, बीड येथील दुर्ग अभ्यासक कचरू चांभारे, सामाजिक कार्यकर्ते रामनाथजी खोड, बारव समितीचे सदस्य, बीड मधील महेश खाडे, पत्रकार व समाजसेवक दत्ता प्रभाळे यांच्यासह अनेक सक्रिय सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकाऱ्यांचे ऑनलाईन काम बंद

## नवीन लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनर उपलब्ध करून देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ डिसेंबर**

ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी हे ग्रामस्तरावर नागरिकांना तातडीच्या सेवा ई फेरफार, ई हक्क, ई पीकपहाणी, सातबारा वाटप, तसेच नवीन ई पंचनामा प्रणाली निरंतर आणि कार्यक्षमतेने प्रदान करण्यासाठी संगणकीकृत साधनसामुग्री अत्यावश्यक आहे. शासनाच्या निर्णयानुसार ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना नवीन लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनर उपलब्ध करून देण्याची मागणी केली परंतु अद्याप उपलब्ध न झाल्याने दि १५ डिसेंबर, सोमवारपासून महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी कार्यालयीन ऑनलाईन कामकाज बंद आंदोलन पुकारले आहे.

महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी संघांच्यावतीने सोमवारी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी संघाचे जिल्हाध्यक्ष गजानन रणखांब, सरचिटणीस विनोद ठाकरे, राज्य कार्यकारणी सदस्य सय्यद अयूब सय्यद रसुल, प्रदीप इंगोले, शेख मोहीज अहमद, अशोक केंद्रेकर, हर्षवर्धन गवई, कल्पना साळवी, संजीवकुमार लोंढे, गोपाल मुनीर, रंगनाथ मेहत्रे आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांना दिलेल्या निवेदनात यापुर्वी सन २०१९ मध्ये ग्राम महसुल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना लॅपटॉप व प्रिंटर उपलब्ध करून दिले होते. परंतु ते आता कालबाह्य झाले आहेत. अद्ययावत शासन प्रणालीच्या किमान निकषांनाही पूरक नाही. काही उपकरणे चालु असली तरी-ही त्यांची कार्यगती इतकी कमी आहे की, नागरिकांना तातडीच्या सेवा ई फेरफार, ई हक्क, ई पीकपहाणी, सातबारा वाटप, तसेच नवीन ई पंचनामा सुधारीत प्रणालीवर काम करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे ऑनलाईन प्रणालीतील नोंदी करणे, प्रस्ताव मंजुर करणे व आवश्यक सेवा वेळेत देणे अशक्यप्राय झाले आहे. कामाचा प्रचंड ताण पाहता कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून शासनाचा निर्णय असूनही प्रत्यक्ष खरेदीप्रक्रिया रखडली आहे. नवीन लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनर उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी संघाच्यावतीने आजपासून कार्यालयीन ऑनलाईन कामकाज बंद आंदोलन करण्यात आले आहे. आंदोलन काळात महसूल ग्राम अधिकारी त्यांच्या सज्जावर हजर राहणार आहेत. परंतु ऑनलाईन कामे करू नयेत असे संघाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील पाचही तालुक्यात तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन सादर करण्याचे सघाने सांगितले आहे.

# पोतरा शिवारात सलग चौथ्या दिवशीही बिबट्याचा वावर

## ट्रॅप कॅमेऱ्यात असल्याचा दोन बिबटे कैद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ डिसेंबर**

कळमनुरी तालुक्यात पोतरा शिवारात मागील चार दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचे स्पष्ट झाले आहे. गावकरी आणि वन विभागाच्यावतीने या बिबट्यांना कैद करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात येत आहेत परंतु दि १४ रविवारी चौथ्या दिवशी बिबट्याने एका कुत्र्याची शिकार केली असून ट्रॅप कॅमेऱ्यात दोन बिबटे कैद झाले. पिंजऱ्यात वन विभागाने आणखी दोन शेळ्या बांधुन ठेवल्या आहेत. दरम्यान बिबट्यांच्या वावरामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोतरा व तेलंगवाडीत बिबट्यांचा वावर असल्याचे स्पष्ट झाले आहे. विभागीय वन अधिकारी डॉ राजेंद्र नाळे, वन परिक्षेत्र अधिकारी मीनाक्षी पवार, वनपाल शिवाजी काळे, वनरक्षक सुधाकर कऱ्हाळे, खंडागळै, योगिता सहारे यांच्या पथकाने दि १४ डिसेंबर रोजी पोतरा शिवारातील टेकड्यावर तीन पिंजरे बसविले आहेत. त्याच परिसरात सुमारे १५ ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या ठिकाणी दोन बिबटे आल्याचे स्पष्ट झाले आहे परंतु ते पिंजऱ्यात गेलेच नाही.

पोतरा शिवारात मागील चार दिवसांपासून एकाच परिसरात बिबट्यांचा वावर असल्याचे दिसून आले आहे. या बिबट्यांना जेरबंद करण्याचे वन विभागाचे युध्दपातळीवर प्रयत्न सुरू असून दोन दिवसात बिबटे जेरबंद होतील अशी अपेक्षा विभागीय वन अधिकारी डॉ नाळे व्यक्त केली आहे. या भागात एक बिबट्या व दोन बछडे शेतकऱ्यांच्या नजरेस पडले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यासह गावकऱ्यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. शेतात जातांना काळजी घ्यावी, रात्रीच्यावेळी दरवाजे बंद करून ठेवावेत,जनावेरे उघड्यावर बांधू नयेत अशा सूचनाही वन विभागाने दिल्या आहेत.

# नर्सी नामदेव येथे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज मूर्ती प्रतिष्ठापनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ डिसेंबर**

नरसी नामदेव येथे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह संगीत राम कथा व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी होत आहे.

संत नामदेव महाराज यांची जन्मभूमी असलेल्या नर्सी नामदेव येथे महाराजांची मूर्ती प्रतिष्ठापना वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राम कथा प्रवक्ते ह भ प श्री समाधान महाराज शर्मा हे राम कथेचं निरूपण करत आहेत. दिनांक १३ डिसेंबर पासून ते १९ डिसेंबर पर्यंत राम कथा सुरू राहणार आहे.



१३ डिसेंबर रोजी ह भ प दादाराव महाराज दिग्रसकर यांचे कीर्तन सकाळी ९.३० ते ११.३० झाले. त्यानंतर संध्याकाळी ६ ते ८ पर्यंत यांचे किर्तन झाले. तर १४ डिसेंबर रोजी ह भ प श्री शिवमुर्ती तेलंगणा आंध्र यांचे किर्तन झाले. तर संध्याकाळी ह भ प श्री पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणा यांचे कीर्तन झाले. १५ डिसेंबर सोमवारी ह भ प श्री महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे कीर्तन सकाळी साडेनऊ ते साडेअकरा पर्यंत होणार आहे. संध्याकाळी सहा ते आठ ह भ प श्री सोपान महाराज शास्त्री वेल तुरा यांचे कीर्तन होणार आहे. १६ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते अकरा ह भ प श्री नामदेव महाराज लबडे यांचे कीर्तन होणार आहे. तर संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत ह भ प श्री अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे कीर्तन होणार आहे. १७ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते अकरा ह भ प श्री अनिल पाटील बार्शीकर यांची कीर्तन होणार आहे. तर संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत ह भ प श्री जगन्नाथ महाराज पाटील मुंबई यांचे कीर्तन होणार आहे. १८ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते अकरा यावेळी ह भ प श्री उमेश महाराज दशरथे यांचे कीर्तन होणार आहे. तर संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत ह भ प श्री उल्हास महाराज सूर्यवंशी यांचे कीर्तन होणार आहे. १९ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते अकरा या वेळेत ह भ प श्री संजय महाराज पाचपोर यांचे कीर्तन होणार आहे. तर संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत ह भ प श्री ज्ञानेश्वर माऊली कदम यांची कीर्तन होणार आहे. २० डिसेंबर रोजी सकाळी ११ ते काल्याचे किर्तन श्री ह भ प संजय नाना घोंडगे मकरंद वाडी यांचे होईल. कै. सखाराम महिपती मुटकुळे आणि कै. यमुनाबाई सखारामजी मुटकुळे यांच्या स्मरणार्थ महाप्रसादाचे आयोजन आमदार तानाजीराव सखाराम मुटकुळे यांच्यावतीने करण्यात आले आहे.श्री संत नामदेव महाराज मंदिर समिती व समस्त गावकरी मंडळींच्या वतीने पंचक्रोशीतील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.

## संक्षिप्त वृत्त

### प्रयासमधील बालकांची ईएनटी तपासणी



हिंगोली- येथील प्रयास संस्थेतील विशेष बालकांच्या नाक, कान व घस्याची तपासणी डॉ. नंदकिशोर करवा यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी डॉ. करवा यांनी बालकांना मार्गदर्शनही केले. विशेष बालकांसाठी काम करणार्या प्रयास सेवाभावी संस्थेत २२ बालकांची नाक, कान, घस्याची तपासणी तज्ञ डॉ. नंदकिशोर करवा यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी या विशेष बालकांच्या नाक, कान व घसा या अवयवांची देखभाल कशी करावी, या अवयवांची स्वच्छता कशी ठेवावी या बाबत डॉ. नंदकिशोर करवा यांनी बालकांना उचित मार्गदर्शन केले. या प्रसंगी संस्थाध्यक्ष वसंतकुमार भट्ट, उपाध्यक्ष डॉ. स्नेहल नगरे, सचिव गुंडेवार, केंद्रप्रमुख राऊत, सौ. प्रतिमा गुंडेवार, भगवान आदी उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. नंदकिशोर करवा यांना विशेष बालकाने काढलेले पोर्टेट भेट करण्यात आले.

### विद्यार्थ्यांची स्मार्ट बाजाराला भेट



हिंगोली- विद्यार्थ्यांना स्मार्ट मॉल मधील आणि सामान्य बाजार पेठेतील फरक समजून घेण्यासाठी शनिवारी शहरातील पवार पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांनी स्मार्ट बाजार या शॉपिंग मॉलला भेट दिली. त्यांना शिक्षणा बरोबरोच व्यवहारिक ज्ञानाचे धडे देण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव पवार, मंदाताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक प्रणव पवार यांनी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासह बाजार पेठेतील नॉलेज मिळवीण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यानुसार दैनंदिन जीवनात लागणारे अत्यावश्यक समान वस्तू, फळेभाज्या, कपडे यांच्या संपूर्ण व्यवहारिक ज्ञानाबद्दल इयत्ता युकेजी व पहिलीतल्या विद्यार्थ्यांची स्मार्ट बाजार मॉल ला भेट देण्यात आली. यावेळी शाळेचे संचालक प्रणव पवार, कोमल अग्रवाल, सॉली केसी, दीपाली राऊत, अपर्णा जामकर, दिपाली मुदिराज, ठाकरे, धनवे, फिजा सय्यद, सचिन धामणे, पंकज इंगोले, सचिन इंगोले, योगेश थोरात, गजानन वानरे, जॉबीन, पाईकराव, वैभव काळे, विकास महानोर, आदींची उपस्थिती होती.

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या व्याख्यानमालेची जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ डिसेंबर**


श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमाला चे आयोजन यावर्षी दिनांक १५ डिसेंबर ते १७ डिसेंबर २०२५ करण्यात आलेले आहे.व्याख्यानमालेत श्रोत्यांनी अधिकाधिक उपस्थित रहावे, याकरिता ग्रामीण भागात प्रसार व प्रचार जनजागृती चे कार्यक्रम प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने घेण्यात आले.



हिंगोली जिल्ह्यातील येडूत, कोथळज, हिंगणी, खेड, कळमकोंडा, हिवराबेल, अंभेरी, बासंबा, सेलसुरा, गोजेगाव, अंजनवाडी, गोजेगाव, येळी, माथा, औंढा नागनाथ या गावात प्रत्यक्ष भेटीतून लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमाला दिनांक १५ डिसेंबर २०२५ ते १७ डिसेंबर २०२५ या कालावधीत सायंकाळी दररोज ७.३० ते ९.३० मिनिटापर्यंत कै. शिवाजीराव सभागृह हिंगोली येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या व्याख्यानमाले मध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते यांना निमंत्रित केले आहे. समाजभिमुख गरजेच्या विविध विषयावर वैचारिक वारसा जपण्याचा काम या व्याख्यानमालेतून केले जात आहे. यासाठी ग्रामीण भागातील व शहरी भागातील तरुण, तरुणी महिला व पुरुष या सर्वांनी सहभागी व्हावं अधिकाधिक विचारांचा जागर करावा यासाठी मार्गदर्शन व प्रसार प्रचार करण्यात आला. ग्रामीण भागातील लोकांनी व्याख्यानमालेला उपस्थित राहण्याचा संकल्प केला. श्री संत भगवान प्रतिष्ठानचे मेजर पंढरीनाथ घुगे, एकनाथराव कुटे, प्रा मुरलीधर जायभाये, राजकुमार मोरगे, संजय चाटे, संजय बांगर व गोपाल बांगर, पिंटू नागरे आदी पदाधिकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी या जनजागृती कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# कापूस खरेदी केंद्रावरील अटी रद्द
# आ. राजू नवघरेंच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १५ डिसेंबर**



शेतकऱ्यांना सिसिआय केंद्रावर खरेदी करण्यात येणाऱ्या कापसासाठी अनेक अडचणी येत होत्या. अवाजवी अटी, नकारात्मक निकष, आर्दता, वजन यासह इतर बाबींमुळे कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले होते. शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन वसमत विधानसभाचे आमदार राजू नवघरे यांनी पणन व वस्त्रोद्योग मंत्री जयकुमार रावल यांची भेट घेऊन अटी व शर्ती शिथील करण्याची मागणी केली होती. संबंधित विभागाकडून सर्व अटी शिथील करण्यात आल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

जिल्ह्यात वसमत व औंढा नागनाथ तसेच कळमनुरी तालुक्यातील मोठ्या प्रमाणात कापसाची लागवड करण्यात आली आहे. सध्या कापसाची विक्री सुरू असून शेतकरी शासनाने ठरवून दिलेल्या किमान आधारभूत किमतीवर सिसिआयच्या कापूस खरेदी केंद्राकडे आपला कापूस विक्री करीत आहेत. परंतू, शेतकऱ्यांना कापूस विक्री दरम्यान अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब आमदार राजू भैय्या नवघरे यांच्या लक्षात येताच त्यांनी बुधवारी पणन व वस्त्रोद्योग मंत्री जयकुमार रावल यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्या तात्काळ सोडविण्याची विनंती केली होती. मंत्री रावल यांनी तात्काळ संबंधित यंत्रणेला सुचना देऊन शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्याचे निर्देश दिले होते. तसेच यापूर्वी प्रतिएकर ५ क्विंटल २० किलो पर्यंतची मर्यादा खरेदीसाठी ठेवण्यात आली होती. ती रद्द करून आता थेट ९ क्विंटल ४७ किलोपर्यंत करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांचा संपूर्ण कापूस सिसिआय खरेदी केंद्रावर विकता येणार आहे. आमदार राजू नवघरे यांनी कापूस खरेदीसंदर्भात पाठपुरावा केल्याने उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# क्रांतीकारी शेतकरी संघटनेकडून वकीलांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ डिसेंबर**

मागील काही दिवसापूर्वी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे, प्रवीण मते व विजय वानखेडे हे पंचायत समिती सेनगाव या ठिकाणी विहिरीचे गोठ्याचे व घरकुलाचे अनुदान अद्याप का नाही मिळाले याकरिता गेले असता त्या ठिकाणी नवनियुक्त गटविकास अधिकारी यांनी संविधान दिन साजरा केला नाही हे गजानन कावरखे यांच्या निदर्शनास आले. त्या ठिकाणी अधिकारी कर्मचारी उपस्थित नसल्याचेही दिसून आले या अनुषंगाने गजानन कावरखे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून



लाईव्ह करून पंचायत समितीचा कारभार जनतेसमोर आणला होता याप्रसंगी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी गजानन कावरखे व त्यांच्या सहकार्यावर ॲट्रॉसिटी तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर ॲड पद्माकर पुरी व योगेश खिलारे यांनी शेतकऱ्यांसाठी निशुल्क केस लढून अटकपूर्व जामीन करून घेतले.

या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या वतीने ॲड पद्माकर पुरी व ॲड योगेश खिल्लारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गजानन कावरखे, नामदेव पतंगे प्रवीण मते विजय वानखेडे, गजानन काळे, शांतीराम सावके संदीप मानमोठे, मनोहर सावके, संजय रोडकर, संजय मुळे, दशरथ मुळे उपस्थित होते.

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त जलालदाभा येथे वृक्षारोपन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ डिसेंबर**




औंढा नागनाथ तालुक्यातील जलालदाभा येथील श्रीमती पी एफ बांगर कला विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय येथे स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची ७६ वी जयंती निमित्ताने वृक्षांचे रोपण करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य गजानन कुटे प्रमुख पाहुणे शिक्षण विस्तार अधिकारी अशोक असोले, मुख्याध्यापक इचनर सिताराम, मुख्याध्यापक गायकवाड आदिनाथ, मुख्याध्यापक भगत सिद्धार्थ यांची उपस्थिती होती. स्वदेशी जागरण दिन व स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रा मेघराज सूर्यवंशी व प्रा अनुजा जोंधळे यांनी स्वागत गीत गायले. प्रा गजानन कुटे यांनी गोपीनाथराव मुंडे यांच्या जीवनावर कार्यावर प्रकाश ज्योत टाकून स्वदेशी चळवळ राबविण्याचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाच्या शेवटी ७६ वृक्षाची रोपण मान्यवरांच्या हस्ते व विद्यार्थी शिक्षक कर्मचाऱ्यांचे वतीने करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघराज सूर्यवंशी यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा राम भुक्तर, प्रा द्रोपदा जगताप, प्रा अनुजा जोंधळे, प्रा संतोष कायंदे, प्रा आनंद कोपले, प्रा गजानन वाबळे, प्रा संदीप जायभाये, अनिल नागरे, नरेश धवसे, भाऊसाहेब चव्हाण, धीरज शर्मा आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना बेघर होऊ देणार नाही ; शिवसेनेच्या आमदारांचे ठोस आश्वासन

**भा वृतसेवा**
**ांदेड, दि. १५ डिसेंबर-**

मागील जवळपास ३५ ते ४० र्षापासून असर्जन येथील पाटबंधारे ंभागाच्या वसाहतीत राहणाऱ्या ावानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना ाटबंधारे विभागाने नोटीस बजावत गाळे ाली करण्याची सूचना केली आहे. या ोटिसीमुळे सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे ुटुंबीय भयभीत झाले असुन आता कुटुंब स्त्यावर येण्याची शक्यता असल्याने ाटबंधारे विभागाची ही कारवाई तात्काळ ांबवावी अशी मागणी करत सेवानिवृत्त र्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी ावसेनेच्या आमदारांसमोर टाहो फोडला. ावेळी आमदार हेमंत पाटील, आमदार ानंद बोंढारकर, आमदार बालाजी ल्याणकर यांनी सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा देत कोणीही बेघर करणार नाही असे आश्वासन दिले.





नांदेड शहरातील असर्जन या ठिकाणी असलेल्या पाटबंधारे विभागाच्या वसाहतीत राहणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पाटबंधारे कार्यालयाकडून गाळे खाली करण्यासंदर्भात नोटीस देण्यात येत आहे. ज्यावेळी हा भाग ओसाड होता, दळण-वळणाची व्यवस्था नव्हती. शहरापासून दूर असलेल्या अशा भागात राहून कर्तव्यावर असलेल्या तत्कालीन कर्मचाऱ्यांनी कुठलीही सुविधा नसताना कर्तव्य बजावत शासनाची सेवा केली. कालांतराने या परिसरात वस्ती वाढली असुन हा भाग आता गजबजुन जात असल्याने या ठिकाणी राहत असलेले आताचे वर्ग ४ चे सेवानिवृत्त कर्मचारी यांना या गाळ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. मागील ४० वर्षापासून हे कर्मचारी व त्यांची कुटुंब वास्तव्यास आहेत. सेवानिवृत्त वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांना अत्यंत तुटपुंजे निवृत्ती वेतन मिळते. या वेतनामध्ये ती त्यांचे कुटुंब चालवतात. हक्काचा निवारा असल्याने त्यांनी यापूर्वी कुठलाही निवारा शोधला नाही किंबहुना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे ते त्यांना शक्य झाले नाही. परंतु आता अचानकपणे त्यांना गाळा रिकामा करण्यास सांगण्यात येत आहे. गाळा रिकामा केल्यानंतर त्यांच्यावर रस्त्यावर येण्याची वेळ येणार असून कुटुंब उघड्यावर पडणार आहे. याला जबाबदार पाटबंधारे विभाग राहणार आहे. त्यामुळे या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे गाळे खाली करून घेण्यापूर्वी त्यांचे पुनर्वसन करावे किंवा ते ज्या गाळ्यात राहतात त्या गाळ्यावर त्यांचा कब्जा द्यावा, त्यांच्या मालकीचे करावे शक्य असल्यास शासकीय दरानुसार त्यांच्याकडून गाळ्याची किंमत वसूल करावी. मागील जवळपास अर्धशतकापासून हे सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय या ठिकाणी राहत असल्यामुळे त्यांची या मातीशी नाळ जुळली आहे. त्यांची पाल्य, नातु अस पासच्या विद्यालयात शिक्षण घेत आहेत.

एकीकडे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आवास योजनेच्या माध्यमातून प्रत्येकांना घरे उपलब्ध करून देत आहेत तर दुसरीकडे पाटबंधारे विभाग सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना बेघर करून त्यांची कुटुंब उघड्यावर पाडत आहे. पाटबंधारे विभागाकडून होत असलेली ही कारवाई कारवाई तात्काळ थांबवावी अशी मागणी करत सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी शिवसेनेच्या आमदारांसमोर टाहो फोडला. यावेळी आमदार हेमंत पाटील, आमदार आनंद बोंढारकर, आमदार बालाजी कल्याणकर यांनी सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा देत कोणीही बेघर करणार नाही असे आश्वासन दिले.

## श्री शिव महापुराण कथेच्या सभा मंडपाचे भुमिपूजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ डिसेंबर-**

श्री सालासर भजन मंडळ आयोजित श्री शिव महापुराण कथाचे आयोजन दि.३ जानेवारी २०२६ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत शहरातील रामेश्वर धाम नवा मोंढा मैदान येथे दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. यासाठी भव्य स्वरुपात भाविकांना बसण्यासाठी सभा मंडप उभारणीच्या कामाला सुरूवात झाली असून त्याचे विधीवत भुमिपूजन करण्यात आले.

नांदेड शहरातील नवीन मोंढा येथील मैदानावर ह.भ.प.श्री.समाधानजी महाराज शर्मा यांच्या अमृतवाणीतून ही कथा वाचन केली जाणार आहे. यासाठी नागरीकांना बसण्याची व्यवस्था करण्यात आली असून दि.१३ रोज शनिवारी प.पू.संत श्री.जगदीशजी बाबाजी महाराज यांच्या हस्ते सभा मंडपाचे भुमिपुजन करण्यात आले. यावेळी गोविंद गुरू महाराज, माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, दिलीप कंदकुर्ते, गोवर्धन बियाणी, दडू पुरोहित, घनशाम गुडगिला, राजेंद्र शुक्ला, बंडू दायमा, प्रल्हादराव काकांडीकर, वैजनाथ मुळे, सत्यनारायण भराडीया,प्रविण कासलीवाल, विजयकुमार पोकर्णा, जगजितसिंघ गिल, किशोर यादव, किशोर शर्मा यांच्यासह आदींची यावेळी उपस्थिती होती.

या श्री शिवमहापुराण कथा संकल्प प.पू.संत श्री.जगदीश बाबाजी गोशाळा खडकुत आणि श्री.सालासर भजन मंडळ नांदेड यांच्यावतीने या कथेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त भाविक भक्तांनी या कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## जेजेचे माजी अधिष्ठाता डॉ. मधुकरराव गायकवा यांना नवोदय रत्न पुरस्कार

**बिलोली** -मुंबई जेजे हॉस्पिटलचे माजी अधिष्ठान तथा औषध विभाग पथक प्रमुख व नांदेड जिल्ह्याचे भूमिपुत्र मधुकरराव गायकवाड यांना त्यांनी १९९७ वर्षीच्या तुकडीत शिकलेल्या शंकरनगर येथील नवोदय



विद्यालय कडून त्यांना यंदाचा नवोदय रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यातील केसराळी ता. बिलोली येथील मूळ रहिवासी व सद्या मुंबई येथील जेजे हॉस्पिटल येथे औषध विभाग पथक प्रमुखपदी कार्यरत असलेले मधुकरराव गंगाराम गायकवाड यांनी ६ वी ते १० वी पर्यंतचे माध्यमिक शिक्षण बिलोली तालुक्यातील शंकरनगर येथील नवोदय विद्यालय घेऊन पुढे अकरावी बारावी लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथील पूर्ण करून जिद्द व चिकाटीने अभ्यास करत छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात एमबीबीएस वैद्यकीय पदवी पूर्ण करून त्यापुढील एमडी पदवीच्युतर पूर्ण करून महाराष्ट्राच्या नामवंत मुंबई येथील सर सेंट जॉर्जस रुग्णालय येथे रुग्णालय अधिष्ठान व मेडिसिन पथक प्रमुख पदावर कार्य करत महाराष्ट्रात आगळी वेगळी ओळख निर्माण केल्याबद्दल त्यांनी माध्यमिक शिक्षण घेतलेल्या शंकरनगर येथील नवोदय विद्यालयाच्या वतीने त्यांना यंदाचा नवोदय रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे सदर पुरस्कार नवोदय विद्यालयाचे सेवा निवृत्त प्राचार्य आर.एस. नायक व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते शंकरनगर येथे २८ डिसेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे.

## राष्ट्रीय लोक अदालतीच्या तडजोडीतून अनेक पाक्षकारांना न्याय


**नायगाव** -महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्या मार्ग दर्शनाखाली नायगांव येथील न्यायालयात शनिवारी राष्ट्रीय लोकअदालतीचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



तालुका विधी सेवा समिती नायगांव (बा.) यांच्या अध्यक्षा तथा दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती ए. टी. गित्ते यांच्या पुढाकारातून ही लोक अदालत पार पडली. या लोक अदालतीत प्रलंबित दिवाणी प्रकरणांपैकी २२ प्रकरणे परस्पर तडजोडीतून निकाली काढण्यात आली. तसेच दाखलपूर्व टप्प्यातील एकूण २,५८० प्रकरणांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्या पैकी २८३ प्रकरणे निकाली निघून बँक व इतर संबंधित कार्यालयांची एकूण १६ लाख ८६ हजार ७१५ रुपयांची वसुली करण्यात आली. याशिवाय गुन्हा कबुलीच्या १३२ प्रकरणांपैकी ९३ प्रकरणांचा निकाल लागून २६ हजार ८०० रुपयांची वसुली झाली. लोक अदालतीमुळे वेळ व खर्चाची बचत होत नागरिकांना जलद न्याय मिळाल्याचे चित्र दिसून आले. लोक अदालतीच्या कामकाजाचा आढावा घेण्या- साठी महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. जी. वेदपाठक ,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेडचे सचिव एस. जी. देशपांडे यांनी न्यायालयास भेट दिली. या लोक अदालतीत पॅनल विधीज्ञ म्हणून ॲड. आर. एल. ऐकलारे यांनी काम पाहिले. तालुका विधीज्ञ संघ नायगाव (बा.) चे अध्यक्ष ॲड. एल. एस. तुमेदवार,सचिव ॲड.एस.बी.कदम यांच्यासह इतर विधीज्ञांनी सक्रिय सहभाग नोंदविला. न्यायालयीन व पोलीस कर्मचारी, तालुक्यातील विविध बँका, पंचायत समिती नायगांव (बा.) तसेच संबंधित विभागांच्या सहकार्यामुळे राष्ट्रीय लोक अदालत यशस्वीरीत्या पार पडली.

## शामराव जिवनराव चौदंते यांचे निधन

**मुदखेड** -मुदखेड शहरातील नविआबादी येथील रहिवाशी सेवानिवृत्त कृषी सहाय्यक अधिकारी का.शामराव जीवनराव चौदंते यांचे दि.१३



डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. त्यांचा आंत्यविधी दि.१४ डिसेंबर रोजी दुपारी ठीक १:३० वाजता भिमनगर येथील बौद्ध स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा, चार मुली, जावई, नातू असा मोठा परिवार आहे. संदेश चौदंते यांचे ते वडील होत.

माने उत्तम दत्तात्रय
विरुध्द
ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हंगीरगा ता.उमरी जि.नांदेड.
प्रकरण - मृत्यू नोंद घेणे बाबत.
व्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे मात्र माने उत्तम दत्तात्रय रा. हंगीरगा ता. उमरी जि. नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ व सुधारीत शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये दिनांक २८/१०/२०२५ रोजी नोंद घेण्यासाठी इ.कि. फौ. अर्ज दि. // रोजी दाखल केला आहे.
अर्जदार यांचा भाऊ नामे साईनाथ दत्तात्रय माने यांचा मृत्यू दिनांक २०/०४/२००९ रोजी झाल्याची नोंद मौ. हंगीरगा ता.उमरी जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.
त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची/मृत्युची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणा-या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतफी आदेश पारीत करण्यात येईल.
दिनांक ०९/१२/२०२५
स्थळ - उमरी
स्वा
तहसिलदार उमरी

## गोकुंदा येथे वस्ती मूलभूत सुविधांपासून वंचित; भूमाफियांच्या नजरा वसाहतीकडे ?

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १५ डिसेंबर-**

तालुक्यातील गोकुंदा येथील वार्ड क्रमांक ०४ व ०५ मधील मराठा महासंघाच्या हॉस्टेलच्या बाजूने असलेली सुमारे ४० ते ५० घरांची वस्ती गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. रस्ता, पाणीपुरवठा, विद्युत खांब व नाल्यांची कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिकांना अक्षरशः चिखल, अंधार आणि सर्पभयात जीवन कंठावे लागत आहे.

सदर वसाहतीमधून जाणारा रस्ता हा तत्कालिन माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांता पाटील यांच्या निधीतून तयार करण्यात आला असला, तरी संबंधित रस्त्याची दुरुस्ती किंवा नूतनीकरण अद्याप झालेले नाही. ग्रामपंचायत गोकुंदा अंतर्गत येणाऱ्या या वसाहतीकडे ग्रामविकास अधिकारी, सरपंच व सदस्यांकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. नागरिकांनी यापूर्वी अनेक वेळा लेखी व तोंडी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. विशेष म्हणजे गटविकास अधिकारी, पंचायत समिती किनवट यांनी दिनांक ०१ जुलै २०२४ रोजी विस्तार अधिकारी व ग्रामविकास अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश देऊनही वर्ष उलटून गेल्यानंतरही प्रत्यक्षात कोणतीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

पावसाळ्यात मुख्य रस्त्यावर येण्यासाठी



वाटचाल करताना नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, अंधारात साप व विषारी प्राण्यांची भीती कायम असते. त्यामुळे महिलां, वृद्ध व लहान मुलांचे जीव धोक्यात येत आहेत. दरम्यान, स्थानिक नागरिकांमध्ये अशीही भीती व्यक्त होत आहे की, वसाहतीकडे जाणारा अधिकृत रस्ता व मूलभूत सुविधा नसल्याचा फायदा घेत भूमाफिया या परिसरातील जागांवर डोळा ठेवून आहेत. शासनाकडून दुर्लक्ष होत राहिल्यास भविष्यात या जागांवर अतिक्रमण किंवा बेकायदेशीर व्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरू आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः पाहणी करून रस्ता, नाला, विद्युत खांब व पाणीपुरवठ्याची तातडीने व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने आमरण उपोषण व तीव्र आंदोलन करण्याचा इशारा वसाहतीतील नागरिकांनी दिला आहे.

## गटविकास अधिकारी कंधार यांच्या खुर्चीला शिवसेनेने घातला बेशरमाचा हार ; १५ डिसेंबरची मुदत उलटली

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. १५ डिसेंबर-**

घरकुल लाभधारकांच्या रक्कम वितरणासाठी १५ डिसेंबरपर्यंत डिएसी सुरू करून कामकाज सुरु करण्याची मागणी करूनही प्रशासनाने दखल न घेतल्याने आज पंचायत समिती कंधार कार्यालयात उबाठा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी गट विकास अधिकारी यांच्या खुर्चीला 'बेशरमचे हार' घालून आंदोलन केले. यावेळी गटविकास अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याने शिवसेना तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली.

गेल्या तीन ते चार महिन्यांपासून पंतप्रधान आवास योजना, मोदी आवास व रमाई आवास योजनेंतर्गत घरकुल लाभधारकांच्या खात्यावर रक्कम जमा झालेली नाही. याबाबत वारंवार निवेदने, भेटी व पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे.

आजच्या आंदोलनादरम्यान पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भालचंद्र



नाईक आणि शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेचा प्रतीकात्मक निषेध करुन भ्रष्ट गटविकास अधिकाऱ्यांची चौकशी झालीच पाहिजे, घरकुलाचे पैसे मिळालेच पाहिजे, बिडिओचा करायचं काय अशा घोषणा देण्यात आल्या गटविकास अधिकारी यांचे कार्यालय बारा वाजले तरी कुलूप लावून गैरहजर असल्याने लाभधारकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली असून प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला.

शिवसेनेच्या वतीने लवकरात लवकर डिएसी सुरू करून सर्व घरकुल लाभधारकांच्या खात्यावर रक्कम जमा करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी पंडितराव देवकांबळे, माजी सैनिक समितीचे बालाजी चुकलवाड, दादाराव शिंदे, विश्वनाथ पवार, सुनिता वडजे, व्यंकटेश सोनटक्के, लक्ष्मण कटवाड, रोहिदास शिराढोणे, आत्माराम लाडेकर, शिवाजी पाटील कदम, अच्युत मेटकर, नारायण वरपडे, जी एम पवळे, व्यंकट मुरकुटे यासह अनेक शिवसैनिक घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनामुळे पंचायत समिती कार्यालयात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाकडून याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

## अवैध रेती वाहतुकीविरोधात अर्धापूर पोलीसांची कारवाई ; ५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. १५ डिसेंबर-**

पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसांनी केलेल्या अवैध वाळू वाहतुकीच्या कारवाईत सुमारे ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैधरित्या विक्रीसाठी घेऊन जात असताना हि कार्यवाही अर्धापूर पोलिसांनी केली आहे.

तालुक्यांमध्ये अवैधरित्या वाळूची वाहतूक व उपसा सुरू असुन पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार पोलिस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे अंतर्गत अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर पोलिसांनी छापेमारी मोहीम राबविण्यात येत आहे. नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर खडकुत पाटी जवळ शुक्रवारी नऊ वाजताच्या दरम्यान टीप्पर चालक अंबादास बैनवाड रा. ब्राम्हणवाडा व टीप्पर मालक रामचंद्र श्यामराव कदम वय ४५ वर्षे रा. बामणी ता.अर्धापुर या आरोपींनी गौनखनिज वाळु चोरुन तिची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना बेकायदेशिररित्या टिप्पर क्र.एम. एच.२६ ए.डी.२३१५ स्वःतच्या फायदया करीता वाहतुक करण्याच्या उदेश्याने मिळून आले, सदर टिपर चालकांनी गर्दी व अंधाराचा फायदा घेवुन धुम ठोकली, पाच लाख रुपये किंमतीचा एक टीप्पर व २.५ ब्रास रेती १० हजार रुपये असा ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोको ज्ञानेश्वर भिसे यांच्या फिर्यादीवरून कलम ३०३(२), ३(५). भा.न्या. सं. व सहकलम ४८ (७), ४८ (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ कायद्याप्रमाणे अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास राजेश गुट्लवाड हे करीत आहेत.




**हदगाव** -होमगार्ड पथक हदगाव येथील दिनांक १४ डिसेंबर रोजी ७९ वा होमगार्ड वर्धापन दिन साजरा करण्यात आला आहे. हदगाव शहरांमध्ये मोठे भक्तीचे श्रद्धास्थान असलेले दत्तबर्डी संस्थान येथे सर्व होमगार्ड कर्मचारी यांनी स्वच्छता मोहीम राबवली व वृक्ष रोपण लागवड केली आणि उपाहार वाटप करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी उपस्थित तालुका समादेशक अधिकारी मधुकर वानखेडे ,वरीष्ठ पल्टन नायक दिपक काकडे,पल्टन नायक शिवाजी पवार, पल्टन नायक मारोती तास्के, पल्टन नायक गणेश गिरबिडे हे उपस्थित होते व यांनी परिश्रम घेतले.

# फुलवळच्या नागनाथ मंगनाळेची गगनभरारी

## भारतीय हवाई दलात दाखल होणारा तो पहिला भूमिपुत्र

**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि. १५ डिसेंबर-**

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील सर्वसाधारण कुटुंबात जन्म घेऊन वयाच्या ६ व्या वर्षीच वडिल ( संजय नारायणराव मंगनाळे ) च तर वयाच्या १४ व्या वर्षी आई ( शिवकांता संजय मंगनाळे ) च छत्र गमावलेल्या नागनाथ (ओम) संजय मंगनाळे ने परिस्थितीची जाणीव ठेवून जिद्दीने पेटून अपार मेहनत करत वयाच्या २० व्या वर्षीच भारतीय हवाई दल ( इंडियन एअर फोर्स ) मध्ये आपलं स्थान पक्क केले असून ता. २७ डिसेंबर २०२५ रोजी बेळगाव येथे तो दाखल होणार आहे. त्याच्या एवढ्या कमी वयात त्याने जिद्दीने मिळवलेल्या यशा बद्दल व त्याच्या निवडी बद्दल सर्वत्र त्याचे कौतुक होत असून भारतीय हवाई दलामध्ये दाखल होणार तो फुलवळचा पहिला भूमिपुत्र ठरला आहे.

फुलवळ सारख्या ग्रामीण भागात



जन्म घेतलेल्या नागनाथ मंगनाळे ची जन्म तारीख ३ एप्रिल २००५ , नागनाथ चे प्राथमिक शिक्षण येथीलच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत झाले , माध्यमिक शिक्षण श्री बसवेश्वर विद्यालय फुलवळ येथे तर उच्यमाध्यमिक शिक्षणासाठी त्याने श्री शिवाजी कॉलेज कंधार येथे पूर्ण केले. काही महिन्यापूर्वीच इंडियन नेव्ही च्या जागा निघाल्याची जाहिरात त्याने वाचली आणि ऑनलाईन तो फॉर्म भरला. त्यात त्याची इंडियन नेव्ही मध्ये गेलेल्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात एस.एस.आर पदासाठी त्याची निवड झाली. पण त्यातच त्याने भारतीय हवाई दलाच्या जागा निघाल्याची जाहिरात पाहून त्यासाठी ही ऑनलाईन फॉर्म भरला होता. त्यानुसार त्यात तो चांगल्या गुणवत्तेने उत्तीर्ण झाला. आणि नुकतेच ता . ९ डिसेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या निवड यादीत नागनाथ ची भारतीय हवाई दलात एक नाही तर दोन अनुक्रमे वाय ग्रुप रॅली भरती आणि वाय ग्रुप स्टार इंटेक अशा दोन पदासाठी एकदाच निवड झाल्याने भारतीय हवाई दलात दाखल होणारा नागनाथ मंगनाळे हा पहिला भूमिपुत्र ठरला असून त्याच्या या गगनभरारी आकाशाला गवसणी घालणाऱ्या यशाबद्दल सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.

बालपणातच आई - वडिलांचं छत्र गमावल्यानंतर घरची परिस्थिती सर्वसाधारण असून आता या दोन्ही चिमुकल्या भावंडांना कोण आणि कसे सांभाळणार याचा विचार करून त्यांचे मामा तुकाराम नामदेव मुदखेड राहणार मानसपूरी ता. कंधार यांनी या दोन्ही भावंडांना आपल्या गावी घेऊन जाऊन त्यांना पुढील शिक्षण देत त्यांचा सांभाळ केला. त्यात वडील मुलगा साईनाथ संजय मंगनाळे हा २०२२ मध्ये वयाच्या १९ व्या भारतीय नौसेना दल ( इंडियन नेव्ही ) मध्ये दाखल झाला. तर आता हा दुसरा नागनाथ मंगनाळे ची नुकतीच भारतीय हवाई दलात (इंडियन एअर फोर्स )मध्ये निवड झाली आहे.

नागनाथ व साईनाथ या भावंडांच्या या झालेल्या निवडीबद्दल फुलवळसह परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या निवडीबद्दल नागनाथ(ओम) मंगनाळे यांची प्रतिक्रिया घेतली असता तो म्हणाला की , वडिलाच्या व आईच्या निधनानंतर त्यांच्या आत्म्याला शांती लाभावी आणि त्यांच आमच्यामुळे नावलौकिक व्हावे यासाठी काहीतरी करून दाखवायचे अशी जिद्दच आपण उराशी बाळगली होती . यात आम्हाला आमच्या मामाची मिळालेली साथ ही सर्वात मोठा सिंहाचा वाटा असून परिस्थितिची जाणीव ठेवून यावर मात करण्यासाठी त्यांनी नेहमीच आम्हाला प्रोत्साहित केले. तसेच माझ्या मोठ्या भावाने पण प्रत्येकवेळी मोलाचे सहकार्य केले आणि माझ्या सर्व गुरुजनांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन करत माझ्यात नेहमीच नवचेतना निर्माण करण्याचे काम केले म्हणूनच मी इथपर्यंत पोहचू शकलो. असे सांगून तो म्हणाला की मनात जिद्द असेल आणि कष्ट , मेहनत करण्याची वृत्ती असेल तर यश नक्कीच आपल्या जवळ आहे एवढेच यातून मी शिकलो , असे सांगून अनेकांनी ही नोकरी खूप अवघड असते असे सांगीतले असतानाही माझ्या मामाने व भावाने मला मोठ्या आनंदाने प्रोत्साहन देऊन भारतीय हवाई दलात दाखल होण्यासाठी प्रेरणा दिली ही माझ्यासाठी खूप मोलाची शिदोरी असून ती मी नेटाने सांभाळत देशाची सेवा प्रामाणिकपणे करणार असा निर्धार ही त्याने बोलून दाखवला.